नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक ४१ * * नागपूर * | शनिवार, दिनांक १० मे २०२५ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/- + वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## राजस्थानमध्येही हाय अलर्ट जारी

■ वृत्तसंस्था, जयपूर, दि. ९ :
भारत-पाकिस्तान तणावाच्या पार्श्वभूमीवर, राजस्थानमधील जैसलमेर, बारमेर, श्रीगंगानगर, बिकानेर आणि फलोदी जिल्ह्यांमध्ये हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. जैसलमेर आणि बाडमेरमधील बाजारपेठा संध्याकाळी ५ वाजता बंद झाल्या. संध्याकाळी ६ ते सकाळी ६ वाजेपर्यंत येथे पूर्णपणे ब्लॅकआउट असेल.

श्रीगंगानगर आणि फलोदीमध्ये संध्याकाळी ७ ते सकाळी ६ वाजेपर्यंत वीजपुरवठा खंडित राहील. जैसलमेरमध्ये सर्व सार्वजनिक कार्यक्रमांवर बंदी घालण्यात आली आहे.लग्न समारंभ आणि धार्मिक कार्यक्रमांमध्ये प्रकाशयोजना आणि डीजेवर बंदी घालण्यात आली आहे.

अग्रलेख

## खरीखरी..

### पाकिस्तान : तुकडे-तुकडे गँग

१९७१ ला भारताने पाकिस्तानचे दोन तुकडे केले होते. बांगलादेशची निर्मिती करून भारताने पाकचे नाक असे काही कापलेले आहे की, ती जखम अजूनही भरून निघालेली नाही. असे असले तरी पाकिस्तानी सैन्याची गुंडगिरी आणि माजोरीपणा मुळीच कमी झालेला नाही. पाक सैन्य केवळ वल्गनांवर जगते. पाकिस्तानवर राज्य करणारे पुढारी कोणीही असले. तरी सत्ता पाकिस्तानच्या लष्कराचीच असते. अशा परिस्थितीमुळे आधीच दुभंगलेल्या पाकिस्तानला स्वतःच्या देशातील संपूर्ण जनतेचा पाठिंबा मिळत नाही. हीच खरी यांची शोकांतिका आहे. इकडे भारतातील तमाम विरोधी पक्षांनी एका सुरात सरकारला आपला पाठिंबा जाहीर केलेला आहे. तिकडे पाकिस्तानात काय दिसते. तिथे सत्तारूढ पक्षाचे नेतेच सरकारची ऐसीतैसी करण्यासाठी पुढे सरसावलेले आहेत. इमरान खान यांचा पक्ष तर पाकिस्तानातील सत्तारूढ सरकार आणि लष्कर यांच्याशी उभा दावा मांडून आहे. बहुसंख्य जनता पाकिस्तानातील लष्करशाहीला पार विटलेली आहे. भारताने ज्या पद्धतीने योजनाबद्ध प्रकारे सामान्य जनता किंवा सैन्याला नुकसान करणारे कोणतेही पाऊल उचलले नव्हते. त्याची प्रतिक्रिया म्हणून या पाकड्यांनी काय केले. तर भारतातील वस्त्यांवर, आपल्या शाळांवर, आपल्या येथील निरपराध नागरिकांवर, धार्मिक स्थळांवर, गजबजलेल्या जागांवर हल्ले करण्याचा प्रयत्न पाकिस्तानच्या लष्कराने केला. तो आपल्या सेनेने सपशेल फोल ठरवला. पाकिस्तानला कधीच हे कळू शकणार नाही. आपसात कितीही मतभेद असले तरी परकीय आक्रमणासमोर आपली एकजूट दिसली पाहिजे. पाकिस्तानात नेमकी याच गोष्टीची कमतरता आहे. याचाच अर्थ असा की पाकिस्तानचे अजूनही तीन-चार तुकडे होऊ शकतात. भविष्यात पाकिस्तान म्हणजे तुकडे-तुकडे गँग असेल, यात अजिबात वाद नाही. आज पाकचे लष्कर म्हणजे पाकिस्तानमधील फक्त पंजाब्यांचे लष्कर आहे. अशा परिस्थितीमुळे पाकिस्तान बाबत सिंध, पख्तून आणि बलुची जनतेला अजिबात प्रेम वाटत नाही. आता युद्धाच्या आणि लढाईच्या कालखंडात बलुचिस्तान मध्ये पाकिस्तानी लष्कराची गाडी अक्षरशा उडवण्यात येते. यावरून त्या प्रांताचे मनसुबे जाहीर झालेले दिसतात. आपले सरहद्द गांधी म्हणजेच खान अब्दुल गफार खान जेव्हा भारत देशाची फाळणी झाली. तेव्हा असे म्हणाले होते की, भारताने आम्हाला लांडग्यांसमोर टाकून दिलेले आहे. खरोखरच हे त्यांचे वचन किती खरे होते. हे आता दिसून येत आहे. भारताने नुकतीच सिंधू जल कराराला स्थगिती दिल्यावर काही दिवसांपूर्वीच काही नद्यांचे पाणी पाकिस्तानात जाऊ दिले नव्हते. परत काल भारताने त्या महानदीचे पाणी जाण्यासाठी धरणाचे दरवाजे पुरते मोकळे केले. यामुळे जलप्रलयाची परिस्थिती पाकिस्तान मध्ये सर्वत्र उत्पन्न झालेली आहे. आता तर पाकड्यांनी स्वतःच शिमला करार रद्द केल्यामुळे भारताने हल्ले करणे. म्हणजे कराराचे उल्लंघन आहे, असे आता तरी पाकिस्तानला म्हणता येणार नाही. याला म्हणतात 'आ बैल ... मुझे मार'. पाकिस्तानला कोणत्या वेळी कोणती कृती करावी. याचे साधे भानही शिल्लक राहिलेले दिसत नाही. बरं, त्यांना भान तरी कुठून राहणार. संपूर्ण पाकिस्तानभर भारतीय आक्रमणाच्या रक्तरंजित छायेखाली पाकचे लष्कर अक्षरशा दळून आणि भरडून निघत आहे. आता भारताने लढाई सुरू केलेली आहे. या आरपारच्या लढाईसाठी भारताकडे सुसज्ज यंत्रणा आहे. सेनेचे मनोधैर्य आहे, जनतेचा पाठिंबा आहे आणि राजकीय नेतृत्वाची पूर्णपणे साथ आहे. या राजकीय नेतृत्वात सत्ताधारी पक्षाबरोबर सर्व मतभेद विसरून सर्वच विरोधी पक्ष सामील आहेत. हे दैवदुर्लभ दृश्य पाकिस्तानला आणि पाकिस्तानातील जनतेला केवळ बघता येते. हा त्यांचा दैवदुर्विलास आहे. भारताच्या दिग्विजयी सेनेला थांबवण्यासाठी आम्हाला मदत करा हो! अशी आर्त याचना त्याच पाकिस्तानचे तथाकथित पुढारी आता बेंबीच्या देठापासून करत आहेत. तेव्हा पाकिस्तानच्या या याचनेला आपले मोदीजी किती भाव देतात. यावरच एकसंघ (?) पाकिस्तानचे भवितव्य अवलंबून आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# पाकचे भ्याड हल्ले सुरूच

## भारताचे चोख प्रत्युत्तर ■ सीमेवरील गावे रिकामी ■ चंदिगड-अंबालामध्ये हवाई हल्ल्यांची वॉर्निंग

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ९ :
भारताने सुरू केलेली ऑपरेशन सिंदूर मोहिम आता अधिक तीव्र झाली असून, प्रत्युत्तरादाखल पाकिस्तानकडून सीमावर्ती भागावर भ्याड हल्ले करणे सुरूच आहे.

गेल्या ३ दिवसांपासून पाकिस्तानी सैन्य नियंत्रण रेषेवर (एलओसी) सतत गोळीबार करत आहे. यामध्ये १७ नागरिकांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये ५ मुलांचाही समावेश आहे. अनेक इमारती आणि वाहनांचेही नुकसान झाले आहे.

दरम्यान, पाकिस्तानसोबतच्या तणावावर परराष्ट्र मंत्रालयाने शुक्रवारी संध्याकाळी ५.३० वाजता पत्रकार परिषद घेतली. यामध्ये परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांच्यासह कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग उपस्थित होत्या.

कर्नल सोफिया कुरेशी म्हणाल्या, ८-९ मे च्या मध्यरात्री, पाकिस्तानी सैन्याने भारतीय युद्धक्षेत्रात अनेक हल्ले केले, लष्करी पायाभूत सुविधांना लक्ष्य केले. आंतरराष्ट्रीय सीमेवर ३६ ठिकाणी घुसखोरीचे प्रयत्न झाले. सुमारे ३००-४०० ड्रोन वापरले गेले. त्यांचा उद्देश गुप्तचर यंत्रणा आणि हवाई संरक्षण प्रणालींबद्दल माहिती गोळा करणे होता.

प्राथमिक तपासात हे ड्रोन तुर्कीचे असल्याचे समोर आले. याची चौकशी केली जात आहे. हे भारतीय सैन्याने उद्ध्वस्त केले. एक युएव्ही देखील हालचाल करत होते, जे





निष्क्रिय करण्यात आले होते. पाकिस्तानने नियंत्रण रेषेवर जोरदार गोळीबार केला, ज्यामध्ये काही सैनिक जखमी झाले. ७ मे २०२५ रोजी रात्री ८:३० वाजता क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ला करण्यात आला आणि त्या काळात भारताने आपले हवाई क्षेत्र बंद केले नाही. नागरिकांना ढाल म्हणून वापरले.

पंजाब सेक्टरमध्ये हाय एअर डिफेन्स अलर्ट दरम्यान, आमचे हवाई क्षेत्र नागरी उड्डाणांसाठी बंद होते, परंतु एक नागरी उड्डाण पाकिस्तानच्या हद्दीवरून चालत होते. पाकिस्तानच्या नागरी विमानाने दमासहून लाहोरला उड्डाण केले. भारतीय हवाई दलाने संयम दाखवून प्रतिसाद दिला आणि आंतरराष्ट्रीय नागरी हवाई सेवांची सुरक्षा सुनिश्चित केली. पाकिस्तानच्या यूएव्हीने भटिंडा आर्मी स्टेशनला लक्ष्य करण्याचा प्रयत्न केला होता, जो पाडण्यात आला.

परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री म्हणाले की, काल रात्री पाकिस्तानी सैन्याने भारतीय शहरे, नागरी पायाभूत सुविधा आणि काही लष्करी प्रतिष्ठानांना लक्ष्य केले. भारतीय लष्करी तुकड्यांनी याला प्रत्युत्तर दिले. पाकच्या प्रत्येक हल्ल्याला भारतीय आर्मी व एयर फोर्स हाणून पाडत आहे.



भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्धाची परिस्थिती कायम आहे. उरी भागात पाकने केलेल्या गोळीबारात अनेक नागाकिंचा मृत्यू झाला असून, तणाव कायम आहे.

तेल कंपन्या आयओसी, बीपीसीएल आणि एचपीसीएलने स्वतंत्र निवेदनात म्हटले आहे की देशात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा आहे. घाबरून खरेदी करण्याची गरज नाही.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत तिन्ही लष्कर प्रमुख आणि सीडीएस अनिल चौहान यांची पंतप्रधान निवासस्थानी बैठक घेण्यात आली. केंद्र सरकारने एक अधिसूचना जारी केली आहे. असे म्हटले जाते की जर लष्करप्रमुखांना हवे असेल तर ते प्रादेशिक सैन्याच्या (टीए) अधिकाऱ्यांना आणि सैनिकांना बोलावू शकतात. टीए हे एक निमलष्करी दल आहे जे गरज पडल्यास सैन्याला मदत करते.

गुजरातच्या कच्छ जिल्ह्यात पाकिस्तानने ड्रोन हल्ल्याचा प्रयत्न केला. कच्छ सीमेवर ड्रोन हल्ल्याचा प्रयत्न करताना तीन ड्रोन पाडण्यात आले. गुजरातच्या सीमावर्ती भागात पाकिस्तानकडून हल्ला होण्याची शक्यता असल्याने राज्यातील १८ जिल्हे हाय अलर्टवर आहेत. भूज विमानतळ लष्कराने ताब्यात घेतले आहे.
बनासकांठा, कच्छ आणि पाटणच्या सीमावर्ती भागातील गावांमध्ये ब्लॅकआउट करण्यात आले. मात्र, सकाळी वीजपुरवठा सुरू करण्यात आला. मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांच्या नेतृत्वाखाली गांधीनगर येथील आपत्कालीन ऑपरेशन सेंटरमध्ये एक बैठक झाली.

गृह मंत्रालयाने राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना आपत्कालीन अधिकारांचा वापर करण्याचे आदेश दिले आहेत.
संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांना लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी, नौदल प्रमुख अॅडमिरल दिनेश त्रिपाठी, एअर चीफ मार्शल एपी सिंग आणि सीडीएस अनिल चौहान यांनी ताज्या परिस्थितीची माहिती दिली.गृहमंत्र्यांनी बीएसएफ आणि सीआयएसएफ अधिकाऱ्यांसोबतही बैठक घेतली. त्यांनी भारत-पाकिस्तान सीमा आणि विमानतळांच्या सुरक्षेची माहिती घेतली. कृषी मंत्रालय आणि आरोग्य मंत्रालयानेही तयारीबाबत बैठक घेतली.

## चंदिगड, अंबालामध्ये हवाई हल्ल्यांची वॉर्निंग

भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्धाची परिस्थिती आहे. शुक्रवारी चंदीगड आणि अंबाला येथे हवाई हल्ल्याचा इशारा देण्यात आला आहे. लष्कराचे पश्चिम कमांड चंदीगडमध्ये आहे, तेथे एनआयएचे कार्यालय देखील आहे. अंबाला येथे एक हवाई दलाचे तळ आहे.

राजस्थानमधील जैसलमेरमध्ये पाकिस्तान सीमेपासून २० किमीच्या परिघात गावे रिकामी केली जात आहेत. जैसलमेरमध्ये एक लष्करी तळ आहे आणि पाकिस्तान सीमेच्या ५०० किमी अंतरावर आहे.

दरम्यान, जम्मू आणि काश्मीरमधील सांबा येथे आंतरराष्ट्रीय सीमेवर बीएसएफने ७ दहशतवाद्यांना ठार मारले. पाकिस्तानच्या धंधार चौकीवर गोळीबार करण्यात आला.

नियंत्रण रेषेवरील पूंछ भागात पाकिस्तानी सैन्य सतत गोळीबार करत आहे. पूंछसह जम्मू आणि काश्मीरमध्ये १७ नागरिकांचा मृत्यू झाला. यामध्ये ५ मुलांचाही समावेश आहे.

दरम्यान, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह लष्करप्रमुखांसोबत बैठक घेत आहेत.

पाकिस्तानने जम्मू आणि काश्मीर, पंजाब आणि राजस्थानमध्ये ११ ठिकाणी ड्रोन आणि क्षेपणास्त्रांनी हल्ला केला. पाकिस्तानी आत्मघातकी ड्रोनने जम्मू विमानतळ आणि पठाणकोट हवाई दलाच्या तळालाही लक्ष्य केले.

भारताने नियंत्रण रेषेवर ाकिस्तानी ड्रोन पाडले आहेत. पठाणकोटमध्ये पाकिस्तानी लढाऊ विमान पाडल्याचे वृत्त देखील आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या एकीकरणावर चर्चा करून निर्णय घेणार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ९ :
राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांच्या एकीकरणासंबंधी सकारात्मक संकेत दिले आहेत.



त्यानंतर आता त्यांच्या कन्या खासदार सुप्रिया सुळे यांनी या प्रकरणी सर्वच कार्यकर्त्यांशी संवाद साधून योग्य तो निर्णय घेणार असल्याचे विधान केले आहे. पण त्याचवेळी त्यांनी या प्रकरणी शरद पवार काय म्हणाले याची आपल्याला कोणतीही कल्पना नसल्याचा अजब दावाही केला आहे.

शरद पवार यांनी एका वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत आपल्या पक्षात दोन वेगवेगळे मतप्रवाह असल्याचे स्पष्ट केले होते. यापैकी एक गट अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसोबत जाण्याच्या विचाराचा असून, दुसरा इंडिया आघाडीत

▶▶ पान ८ वर

## पाकविरोधात लढताना मुंबईचा जवान शहीद

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ९ :
भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांमध्ये मोठा तणाव निर्माण झाला आहे. पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्याला भारतीय लष्कराने ऑपरेशन सिंदूर अंतर्गत जोरदार प्रत्युत्तर देत पाकिस्तान व पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी अड्डे उडवले.

यात अनेक दहशतवादी ठार झाले आहेत. त्यानंतर पाकिस्तानने ड्रोन हल्ले केले, त्याला देखील भारताने जोरदार प्रत्युत्तर दिले. या युद्धात मुंबईच्या जावानाला वीरमरण आले आहे. पाकिस्तानच्या या कारवायांना उधळून लावताना भारतीय सैन्य दलाचे दोन जवान शहीद झाले आहेत.

पाकिस्तानचे हल्ले परतवून लावत असताना भारतीय सैन्य दलातील दोन जवान शहीद झाले आहेत. यात मुंबईतील आणि मूळचे आंध्र प्रदेशचे मुरली नाईक, तर दुसरे जवान दिनेश शर्मा यांना पूँछ सेक्टरमध्ये पाकिस्तानशी लढताना वीरमरण प्राप्त झाले.



गोळीबारात जखमी झाल्यानंतर शर्मा यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारादरम्यान त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

मुरली नाईक हे दिनांक ९ मे रोजी पहाटे एलओसी येथे पाकिस्तानसोबत झालेल्या युद्धात शहीद झाले आहेत. मुंबई येथील घाटकोपर येथे त्यांच्या शहीद झाल्याचे बॅनर लावले आहे.

## महाराष्ट्रात हाय अलर्ट!

### मुख्यमंत्र्यांनी घेतली तातडीची सुरक्षा बैठक



पर्यटन व आध्यात्मिक स्थळांची सुरक्षा वाढवली

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ९ :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीची सुरक्षा बैठक बोलावली. आज दुपारी झालेल्या या बैठकीचे उद्दिष्ट परिस्थितीचा आढावा घेणे आणि सध्याच्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सुरक्षा उपाययोजनांचा आढावा घेणे होते.

फडणवीस यांच्या व्यतिरिक्त, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी सांगितले होते की, सुरक्षेबाबत बैठक घेतली जाईल. पोलिस सज्ज आहेत आणि लोकांना सतर्क करण्यासाठी मॉक ड्रिल आयोजित केले जात आहेत.

पाकिस्तानमध्ये झालेल्या हवाई हल्ल्यानंतर महाराष्ट्रात अलर्ट देण्यात आले आहे. महाराष्ट्रातील महत्त्वाच्या प्रतिष्ठानांची, पर्यटन स्थळांची, आध्यात्मिक स्थळांची सुरक्षा वाढवण्यात आली आहे. त्या सर्व ठिकाणी अधिक दक्षता ठेवण्याच्या सूचना पोलिसांना देण्यात आल्या आहेत.

मुंबई पोलिसांनी सर्व कर्मचाऱ्यांसाठी नवीन रजा मंजूर करणे स्थगित केले आहे. वैयक्तिक आपत्कालीन परिस्थिती शिवाय कोणत्याही पदासाठी रजा मंजूर करू नये असे निर्देश वरिष्ठ अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. सर्व कर्मचाऱ्यांना अधिकार क्षेत्रात राहण्याचे आणि सतर्क राहण्याचे निर्देश मुंबई पोलिसांच्या वतीने देण्यात आले आहेत.

**मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिलेले निर्देश पुढीलप्रमाणे**

- प्रत्येक जिल्ह्यात मॉकड्रिल करा आणि जिल्हा स्तरावर वॉर रूम स्थापित करा.
- ■ ब्लॅकआऊट वेळी हॉस्पिटल सोबत समन्वय यंत्रणा उभी करा. टार्गेट होऊ नये म्हणून लाईट बंद केले जातात, त्यामुळे पर्यायी विद्युत व्यवस्थे द्वारे यंत्रणा सुरू ठेवून, गडद रंगाचे पडदे अथवा गडद रंगाच्या काचा वापरून त्याचवेळी बाहेरून लाईट दिसणार नाही, अशी व्यवस्था करा.
- ■ ब्लॅकआऊट म्हणजे काय आणि अशावेळी काय करावे, यांचे व्हिडिओ विद्यार्थी, नागरिकांपर्यंत पोहोचवा. व्यापक जनजागरण करा.
- ■ केंद्र सरकारच्या युनियन वॉर बुक चे सखोल अध्ययन करीत सर्वांना त्याची माहिती द्या.
- ■ प्रत्येक जिल्ह्यात पोलिसांच्या सायबर सेलने समाज माध्यमांवर देखरेख ठेवत पाकिस्तानला मदत करणारे हॅंडल ओळखून त्यावर कारवाई करा. शत्रूला मदत करणारी अथवा चुकीची माहिती कुणी प्रसारित

▶▶ पान ८ वर

## ठाकरे सरकार नसते तर दिड वर्षे आधी मेट्रो आली असती...

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :
मागील काळात अडीच वर्षे अडचणी आल्या होत्या. त्या काळात मेट्रो शेडचा देखील वाद उभा राहिला होता. त्या सर्व अडचणींवर मात करून आता आपली मेट्रो अंतिम टप्प्यात पोहोचली असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे . तो अडीच वर्षांचा काळ नसता तर मुंबईची मेट्रो किमान एक ते दिड वर्षे आधी पूर्ण झाली असती, असा टोला देखील त्यांनी लगावला. या माध्यमातून उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता मुख्यमंत्र्यांनी उद्धव ठाकरे यांच्या कार्य काळावर निशाणा साधला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिरवा झेंडा दाखवून 'मुंबई मेट्रो मार्ग ३, टप्पा २-अ बीकेसी ते आचार्य अत्रे चौक (९.७७ किमी)' सेवेचा शुभारंभ केला. ऑक्टोबर २०२४ मध्ये आरे जेव्हीएलआर ते बीकेसी (१२.६९ किमी) मार्गाचा शुभारंभ झाला होता. ही देशातली सर्वात लांब सिंगल अंडरग्राउंड मेट्रो लाईन असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस

▶▶ पान ८ वर

## बेकायदा वाहतुकीवर परिवहनमंत्री अवाक

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :
राज्यभरात २०११ च्या स्कूल बसच्या धोरणाप्रमाणे स्कूल बसेस चालवण्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे. मात्र बेकायदा पद्धतीने स्कूल बसेस, टॅक्सी, इकोमधून सर्रास विद्यार्थ्यांची वाहतूक केली जात आहे. त्यामुळे राज्यात तब्बल ५० हजारांपेक्षा अनेक स्कूल व्हॅन बेकायदा विद्यार्थ्यांची वाहतूक करतात.

त्यांच्यावर कारवाई कधी असा प्रश्न अनिल गर्ग यांनी उपस्थित केल्यानंतर परिवहनमंत्री प्रताप सरनाईक अवाक होऊन एवढ्या मोठ्या प्रमाणात बेकायदा वाहतूक काही केली जाते का? असे म्हणत ६ जूनपर्यंत बेकायदा सर्व

### ५० हजार अवैध स्कूल बसेसवर कारवाई करा



वाहनांवर कारवाईचे आदेश दिले. जी वाहने नियमात बसतील त्यांना नियमात कसे बसवायचे यासंदर्भातील जबाबदारी सहपरिवहन आयुक्त रवी गायकवाड यांच्यावर सोपवण्यात आली आहे.

स्कूल बस आणि त्यासाठीच्या सुरक्षा आणि शुल्कवाढ आदी अनेक प्रश्नांच्या संदर्भात परिवहनमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली यशवंतराव चव्हाण सभागृह येथे स्कूल बस असोसिएशन व पालक असोसिएशन यांच्या प्रतिनिधींची बैठक झाली.

स्कूल बसमधून विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनचालकांनी नियमांचे काटेकोर पालन करावे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही. नियमावलीत सुधारणा करताना वाहनचालक आणि पालक संघटनांच्या

▶▶ पान ८ वर

## सिंधू पाणी करारावरून पाकिस्तानला करारा झटका

■ वृत्तसंस्था, न्यूयॉर्क , दि. ९ :
सिंधू पाणी करारावरून जागतिक बँकेने पाकिस्तानला मोठा झटका दिला आहे. आम्ही भारताला आपला निर्णय बदलण्यास भाग पाडू शकत नाही, असे जागतिक बँकेचे अध्यक्ष अजय बंगा यांनी म्हटले आहे. तसेच द्विपक्षीय मुद्द्यांमध्ये मध्यस्थाव्यतिरिक्त संस्थेची कोणतीही भूमिका नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बंगा म्हणाले की, हा करार दोन्ही देशांमधील आहे आणि जर ते असहमत असतील तर जागतिक बँकेची भूमिका फक्त वाद सोडवण्यासाठी तटस्थ तज्ञ किंवा मध्यस्थीची व्यवस्था करणे आहे. ही आमची भूमिका आहे.

दरम्यान, भारताचा एकतर्फी आणि बेकायदेशीर निर्णय रद्द करण्यासाठी आम्ही जागतिक बँकेकडे जाणार असल्याचे पाकिस्तानने गेल्या महिन्याच्या अखेरीस म्हटले होते. भारत-पाकिस्तान युद्धाच्या परिस्थितीत जागतिक बँकेच्या अध्यक्षांचे हे विधान आले आहे.

## पाकिस्तानने मर्यादेत राहावे



■ **मुंबई :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ऑपरेशन सिंदूरचे कौतुक केले आणि पाकिस्तानला मर्यादेत राहण्याचा इशारा दिला आहे. कोणत्याही चिथावणीची मोठी किंमत पाकिस्तानला मोजावी लागेल, असा इशारा देखील शिंदे यांनी दिला आहे.
हा नवा भारत आहे. हा भारत शत्रूच्या हद्दीत हल्ला करणारा आहे. पाकिस्तानने त्याच्या मयार्देत राहावे. त्यांच्या कृती त्यांना महागात पडतील. पंतप्रधान मोदींनी ऑपरेशन सिंदूर द्वारे धडा शिकवला आहे, असे शिंदे पत्रकारांशी बोलताना म्हणाले.

## पंकजा मुंडे यांचा नाशिक दौरा रद्द



■ **मुंबई :** मुंबई येथील साकीनाका परिसरात एक संशयास्पद ड्रोनदिसल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यानंतर काही ठिकाणी हेलिकॉप्टरने उड्डाणे रद्द करण्यात आली आहे. यात उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या देखील हेलिकॉप्टरचे उड्डाण रद्द करण्यात आले आहे. पंकजा मुंडे यांच्या हेलिकॉप्टर उड्डाणाला परवानगी देण्यात आली नाही. त्यामुळे पंकजा मुंडे यांचा नाशिक दौरा रद्द करण्यात आला आहे. पंकजा मुंडे या शिरूर येथून हेलिकॉप्टरने नाशिकला येणार होत्या. मात्र, आता त्यांचा दौरा रद्द झाला आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी आणि उद्योजकांसोबत बैठक होणार होती. ही बैठक आता रद्द करण्यात आली आहे.

## सिद्धिविनायक मंदिराचा मोठा निर्णय



■ **मुंबई :** मुंबई येथील सिद्धिविनायक मंदिर प्रशासनाने भाविकांच्या सुरक्षेसाठी काही महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. मंदिर प्रशासनाने येत्या रविवारपासून भाविकांना हार आणि नारळ अर्पण करण्यास मनाई केली आहे. भारत आणि पाकिस्तानमधील वाढत्या तणावामुळे खबरदारीचा उपाय म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे.

## देशाने एकजूट दाखवावी



■ **मुंबई :** भारताच्या सीमेवर कमालीचा तणाव असताना मुलाखत, गप्पा यासारखे कार्यक्रम करणे उचित नाही, असे माझे मत आहे. असे म्हणत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांची एका वृत्तवाहिनी सोबत होणारी मुलाखत पुढे ढकलण्यात आली आहे.

याबाबतच्या भावना आपण वृत्त वाहिनीला कळवली असल्याचे राज ठाकरे यांनी म्हटले आहे. या भावनेचा त्या वृत्तवाहिनीने देखील सन्मान करत मुलाखत पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला असल्याचे ते म्हणाले. अशा काळात सर्व देशाने एकजूट असणे आणि भारतीय सैन्य आणि सीमा भागातील भारतीय नागरिकांच्या सोबत असणे, त्यांच्यासाठी प्रार्थना करणे, हे महत्त्वाचे आहे, असे देखील राज ठाकरे यांनी म्हटले आहे. त्यामुळे आता ही मुलाखत रद्द झाल्याची सर्वांनी नोंद घ्यावी. इतर सर्व विषयांवर आपण सविस्तर बोलणार असल्याचे राज ठाकरे यांनी म्हटले आहे. या संदर्भात एका पोस्टच्या माध्यमातून राज ठाकरे यांनी ही माहिती दिली आहे.

## टाटा रुग्णालयाला धमकीचा ईमेल

■ **मुंबई :** पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानात राबवलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'च्या पार्श्वभूमीवर भारत-पाकमध्ये मोठा तणाव निर्माण झाला असताना आता मुंबईतील टाटा मेमोरियल या प्रसिद्ध रुग्णालयाला धमकीचा ईमेल आला आहे. या मेलनंतर मुंबई पोलिसांनी रुग्णालयात सर्च ऑपरेशन राबवून सुरक्षेची खबरदारी घेतली आहे.
परेळ येथील टाटा रुग्णालयाला धमकीचा मेल प्राप्त झाला आहे. त्यामुळे येथील सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे. तसेच या ठिकाणी संपूर्ण रुग्णालयात सर्च ऑपरेशन राबवण्यात आले आहे. बॉम्ब नाशक पथकही घटनास्थळी येऊन आपले काम करत आहे. पोलिस ही धमकी कोणत्या आयपी अ‍ॅड्रेसवरून आली? याचा शोध घेत आहेत.

## सीएची मुख्य परीक्षा पुढे ढकलली

■ **मुंबई :** भारत आणि पाकिस्तान यांच्यात निर्माण झालेल्या वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर चार्टर्ड अकाउंटंट (सीए) ची मुख्य परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाने यासंदर्भात अधिकृत परिपत्रक प्रसिद्ध करत ९ मे ते १४ मे दरम्यान होणाऱ्या मुख्य परीक्षांना तूर्तास स्थगिती दिली असल्याची माहिती दिली आहे.
या अचानक बदलामुळे हजारो विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम आणि चिंता निर्माण झाली आहे. परीक्षा आता कधी होणार? नव्या तारखा केव्हा जाहीर केल्या जाणार? अशा प्रश्नांनी सध्या परीक्षार्थींच्या मनात गोंधळ सुरू झाला आहे. पुढील परीक्षा कधी आणि कशा पद्धतीने घेतल्या जातील, याची माहिती लवकरच अधिकृतपणे दिली जाईल, असे स्पष्ट करण्यात आले आले. सीए परीक्षेला केवळ देशातच नव्हे, तर परदेशातही लाखो विद्यार्थी बसत असतात. मात्र, तणावाच्या पार्श्वभूमिवर परीक्षेवर झालेला परिणाम हा अभूतपूर्व ठरतोय.

# तणावाच्या पार्श्वभूमीवर नेव्ही अलर्ट





मुंबई लगतच्या समुद्रात हालचाली वाढल्या, मच्छिमारांना संवेदनशील ठिकाणी न जाण्याचे निर्देश

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :** भारत-पाकिस्तान दरम्यान वाढलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर मुंबईतील मच्छिमारांसोबत नौदलाची महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीत नौदलाने समुद्रातील संवेदनशील ठिकाणी मच्छिमारीसाठी जाऊ नये, अशा स्पष्ट सूचना मच्छिमारांना दिल्या आहेत.

विशेष म्हणजे, जर कोणी नौदलाने आखून दिलेल्या प्रतिबंधित क्षेत्रात आढळून आला, तर त्याच्यावर थेट कारवाई केली जाईल, अशी 'शूट टू किल'ची ताकीद देखील देण्यात आली आहे.

नौदलाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, लवकरच मुंबईतील सर्व मच्छिमार बोटींचे सर्वेक्षण करण्यात येणार असून, एका विशेष अ‍ॅपद्वारे या बोटींचा संपूर्ण डेटा गोळा केला जाणार आहे. यामध्ये प्रत्येक बोटीचा क्रमांक, मालकाची माहिती व बोटीचा नेहमीचा प्रवास या गोष्टींची नोंद ठेवली जाणार आहे.

दरम्यान, पाकिस्तानकडून गुजरातमधील काही मच्छिमारांच्या बोटी ताब्यात घेण्यात आल्या असून, मच्छिमारांना सोडून या बोटी जप्त केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. यामुळे २६/११ हल्ल्यासारख्या घटनेत या बोटींचा वापर होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने नौदल सतर्क झाला आहे आणि समुद्र किनाऱ्यावर अलर्ट जारी करण्यात आला आहे, असे वृत्त एका मराठी वृत्तवाहिनीने दिले आहे.

**कोकण किनारपट्टी अलर्ट मोडवर**

भारत आणि पाकिस्तान यांच्यात युद्धजन्य परिस्थितीमुळे कोकण किनारपट्टी परिसर देखील अलर्ट मोडवर ठेवण्यात आला आहे.

कोकण किनारपट्टी भागामध्ये पोलिसांची गस्त वाढविण्यात आली आहे. रात्री पोलिसांकडून वाहनांची तपासणी करण्यात येत असून नाकेबंदी देखील करण्यात आली आहे. कोणतेही वाहन तपासणी शिवाय सोडले जात नाही.

दरम्यान रेडी, विजयदुर्ग, मालवण, देवगड, निवती, पाचोरा आणि वेंगुर्ला बंदर या परिसरात सुरक्षेच्या दृष्टिकोनातून तगडा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

## साकीनाका परिसरात ड्रोनसदृश वस्तू दिसल्याने खळबळ

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :** भारत-पाकिस्तान सीमारेषेवरील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर मुंबईत सुरक्षा यंत्रणा अलर्ट मोडवर आहेत. गुरुवारी रात्री साकिनाका परिसरात एक संशयास्पद ड्रोनसदृश वस्तू आकाशात दिसल्याचा दावा स्थानिक नागरिकांनी केला आहे.

या घटनेमुळे परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं असून पोलिसांनी तत्काळ कोम्बिंग ऑपरेशन सुरू केले आहे. दरम्यान खबरदारी म्हणून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हेलिकॉप्टरच्या उड्डाणाला परवानगी नाकारण्यात आली आहे.

प्राथमिक माहितीनुसार, साकिनाका येथील एका धार्मिक स्थळाच्या वरती काही क्षणांसाठी एक ड्रोनसदृश वस्तू दिसली होती. त्यानंतर ती झोपडपट्टी भागाच्या दिशेने गेल्याचं काही नागरिकांनी सांगितले. ही माहिती सहार विमानतळावरून मुंबई पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला देण्यात आली, आणि त्यानंतर संपूर्ण सुरक्षा यंत्रणा सतर्क झाली.

साकिनाका पोलिस ठाण्याच्या अधिका?यांनी तात्काळ विविध पथकांसह परिसरात तपासणी सुरू केली. तसेच, सीआयएसएफच्या मदतीने हरी मशिद परिसर, जरीमरी येथे पहाटे पाच वाजताच्या सुमारास कोम्बिंग ऑपरेशन करण्यात आलं. मात्र तपासात कोणताही ड्रोन किंवा संशयास्पद वस्तू आढळून आलेली नाही.

सध्या मुंबईत हाय अलर्ट जारी करण्यात आला असून, कोणतीही अफवा किंवा गैरसमज पसरू नये, यासाठी साकिनाका पोलिसांनी नागरिकांना शांत राहण्याचे आवाहन केले आहे. मुंबई पोलिस आणि केंद्रीय सुरक्षा यंत्रणा सतत संपर्कात असून, हवेतल्या प्रत्येक हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे. नागरिकांनाही सतर्क राहण्याचे सांगण्यात आले आहे.

## प्रसार माध्यमांमधील प्रचारावर नियंत्रण ठेवा : संजय राऊत



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ९ :** भारत आणि पाकिस्तान यांच्यातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, दोन्ही बाजू सतत प्रत्युत्तर देत असल्याने, नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण होत असताना, केंद्राने माध्यमांमध्ये पसरवल्या जाणाऱ्या प्रचारावर बंदी घालावी, असे आवाहन उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केले आहे. ते माध्यमांशी बोलत होते.

सशस्त्र दलांना पाठिंबा देण्याऐवजी आणि सध्याच्या तणावात शहीद होणाऱ्यांना पाठिंबा देण्याऐवजी युद्धाचा आनंद साजरा करणाऱ्यांवरही त्यांनी टीका केली.

अशा काळात प्रसार माध्यमांमध्ये होणाऱ्या प्रचारावर सरकारने नियंत्रण ठेवले पाहिजे. अन्यथा, ते आपल्या सैन्याचे मनोबल कमी करतील, अशी भीती राऊत यांनी व्यक्त केली. संपूर्ण जग आपल्यावर हसत आहे. निवृत्त लष्करी जवानही प्रसार माध्यमांवर जात आहेत, हे काय चालले आहे?' माजी सैनिकांमधील काही जण टीव्हीवर जाऊन क्रिकेटसारखे तज्ज्ञ भाष्य करत आहेत. सशस्त्र दलांची भूमिका राखली पाहिजे कारण ते लढत आहेत, आपण नाही, असे राऊत यांनी येथे पत्रकार परिषदेत पत्रकारांना सांगितले.

वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर निर्माण होणाऱ्या युद्धाच्या उन्मादाबद्दल बोलताना, खासदार राऊत यांनी युद्धाचा आनंद साजरा करण्याविरुद्ध सूचना केली कारण सीमावर्ती भागातील लोक सतत धोक्यात राहत आहेत आणि धोक्यात आहेत.

या माध्यमातून आपण सशस्त्र दलांना पाठिंबा देत नाही आहोत, तर युद्धाचा आनंद साजरा करत आहोत. त्यांनी हल्ला केला आहे की, नाही हे आपण लष्कराला सांगू देऊयात. संरक्षणमंत्र्यांना विधान करू द्या. मला अधिकृत प्रेस नोट्सवर विश्वास आहे. तथापि, निर्माण होत असलेले युद्धाच्या उन्मादाचे वातावरण जनतेमध्ये भीती निर्माण करत असल्याचा दावा त्यांनी केला.

पाकिस्तानच्या गोळीबारामुळे जम्मू आणि काश्मीरच्या पूंछ जिल्ह्यात मुलांसह लोकांचा मृत्यू झाला आहे. नागरिक धोक्यात आहेत. त्यांना युद्धाचा सामना करताना पहा आणि नंतर तो साजरा करा, असेही राऊत म्हणाले.

## नालेसफाईच्या कामात ४० फेरफार उघड

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :** मुंबईतील नालेसफाईच्या कामावर अक (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) तंत्रज्ञानाने गंभीर शंका उपस्थित केल्या असून तब्बल ४०% फेरफार झाल्याचे निष्पन्न झाले आहे. ही धक्कादायक माहिती आज उपनगर पालकमंत्री अ‍ॅड आशिष शेलार यांच्या समोर उघड झाली. त्यांनी यावर तातडीने महानगरपालिका आयुक्तांना चौकशीचे आणि कारवाईचे स्पष्ट आदेश दिले.
एआयच्या माध्यमातून नालेसफाईच्या ट्रकांद्वारे नेण्यात येणाऱ्या गाळाचे विश्लेषण करण्यात आले. सुमारे ४० हजारपेक्षा अधिक फेऱ्यांपैकी १७ हजार फेऱ्यांमध्ये गाळाच्या नोंदीत मोठा फरक दिसून आला. गाळ कमी, जास्त, माती किंवा डेब्रीजच्या स्वरूपात असू शकतो. काही ठिकाणी गाळ अजूनही नाल्यांमध्येच असल्याचे अक्ने दाखवून दिले.

अ‍ॅड आशिष शेलार यांनी घाटकोपरच्या लक्ष्मी नगर नाल्यापासून पाहणी दौऱ्याला सुरुवात केली. त्यानंतर एपीआय नाला, उषा नगर नाला, माहुल नाला, माहुल खाडी आणि खारू क्रिक परिसरात त्यांनी कामाची पाहणी केली. या वेळी आमदार मिहिर कोटेचा, माजी गटनेते भालचंद्र शिरसाट, विरोधी पक्षनेते रवी राजा, भाजपाचे पदाधिकारी आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.

शेलार यांनी अनेक वर्षांपासून नालेसफाईसाठी तंत्रज्ञानाच्या वापराची मागणी केली होती. यंदा इटउ ने अकचा वापर सुरू केला असून गाळ ज्या ठिकाणी टाकला जातो, त्या ठिकाणांचे व्हिडीओ स्कॅन करून डेटाचे विश्लेषण करण्यात आले. या फेऱ्यांमध्ये गाळाच्या स्वरूपात तफावत आढळली आहे. त्यामुळे गाळाची बील, ठिकाणे, वजनी फरक याचे सखोल विश्लेषण करावे.
कंत्राटदारांकडून १००% काम करून घ्या, आयुक्तांनी स्वतः रस्त्यावर उतरून पाहणी करावी, असे निर्देश शेलारांनी दिले.

## मुलाचा खून, बापाची आत्महत्या

■ **महासागर प्रतिनिधी, पालघर, दि. ९ :** पालघर जिल्ह्यातील जव्हार तालुक्यात एक धक्कादायक घटना समोर आली आहे. बेस्टमध्ये कंडक्टर असलेल्या व्यक्तीने स्वतःच्या मुलाची गळा आवळत हत्या केली आहे. मुलाच्या हत्येनंतर स्वतः गळफास घेत आत्महत्या केली.

या घटनेची माहिती पोलिसांना मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेत दोन्ही मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवले आणि घटनास्थळी पंचनामा केला. तसेच या घटनेप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

पालघर जिल्ह्यातील जव्हार तालुक्यात शरद रघुनाथ भोये हे राहत होते. ते बेस्टमध्ये कंडक्टर म्हणून कार्यरत असून त्यांनी आपल्या शेतावरील घरात १५ वर्षीय मुलगा भावेशला मारहाण केली. यानंतर त्याचा गळा आवळून खून केला.

भावेशचा मृत्यू झाल्यानंतर स्वतः गळफास घेत आत्महत्या केली. शरद यांचे वडील रघुनाथ भोये हे मुलगा आणि नातू यांच्याशी संपर्क न झाल्याने शेतावरील घरी गेले. त्यांना त्यांचा नातू भावेश मृतावस्थेत पडलेला होता, तर दुसऱ्या खोलीत शरद भोये यांनी गळफास घेतलेला होता. या घटनेची माहिती मिळताच जव्हार पोलिस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी दोन्ही मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवले आणि घटनास्थळी पंचनामा केला. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

प्राथमिक माहितीनुसार, शरद भोये यांनी आपल्या मुलाचे डोके जमिनीवर आपटून आणि नंतर गळा आवळून त्याची हत्या केली. त्यानंतर त्यांनी नायलॉनच्या दोरीच्या सहाय्याने दुसऱ्या खोलीत गळफास घेऊन आत्महत्या केली.

अद्याप शरद भोये यांनी हे टोकाचे पाऊल का उचलले, याचे कारण स्पष्ट झालेले नाही. तसेच मुलाची हत्या का केली याचेही कारण समोर आलेले नाही. पोलिसांकडून भोये कुटुंबीयांची चौकशी सुरू असून, अधिक तपास जव्हार पोलिस करीत आहेत.

## मुंबईत ठाकरे गटाला मोठा धक्का

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :** महानगरपालिकेतील राजकीय समीकरणांना हादरा देणा?या घडामोडीत, ठाकरे गटाला मोठा धक्का देत माजी नगरसेवक हर्षद प्रकाश कारकर आणि युवासेना नेत्या दिक्षा हर्षद कारकर यांनी आज शिवसेना (शिंदे गट) मध्ये प्रवेश केला.
उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत या दोघांनी धनुष्यबाण हाती घेत पक्षप्रवेश केला. यावेळी शिवसेना सचिव राम रेपाळे, विभागप्रमुख स्वप्नील टेंम्बवलकर आणि महिला आघाडीच्या विभागप्रमुख मीना पानमंद यांच्यासह अनेक स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते. हर्षद कारकर यांनी २०१७ ते २०२२ या काळात मुंबई महापालिकेच्या विधी समितीचे अध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळली होती. त्यांची पत्नी दिक्षा कारकर या युवासेनेच्या कार्यकारिणी सदस्य असून सध्या महिला आघाडीच्या उपविभाग संघटक म्हणूनही त्या सक्रीय आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक महिलांनी शिंदेगटात प्रवेश केला.

## 'पाकिस्तान जिंदाबाद' चे स्टेटस ठेवणाऱ्या तरुणाला कपडे फाटेपर्यंत बेदम मारहाण



■ **वृत्तसंस्था, रायगड, दि. ८ :** ऑपरेशन सिंदूर यशस्वी झाल्यानंतर सोशल मीडियावर पाकिस्तानच्या समर्थनार्थ आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात स्टेटस टाकणाऱ्या तरुणाला रत्नागिरीकरांनी यथेच्छ चोप दिला. या घटनेने शहरात मोठी खळबळ उडवली असून, पोलिसांनी संबंधित तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

महम्मद बद्रुद्दीन परकार (वय २१, मुळ रा. केजीएम प्लाझा, गोवळकोट, चिपळूण, सध्या रा. महादेव नगर, रत्नागिरी) असे संशयित तरुणाचे नाव असून, त्याने इंस्टाग्राम आणि व्हॉट्सअ‍ॅपवर पाकिस्तान जिंदाबाद, मोदी किलर आहे, पाकिस्तानसाठी प्रार्थना करा अशा आशयाचे स्टेटस ठेवून समाजात तणाव निर्माण केला. हे स्टेटस पाहून नागरिक संतप्त झाले आणि तरुणाला शोधून त्याला चोप देण्यात आला.

तरुण जखमी अवस्थेत असताना पोलिसांनी त्याला जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले आहे. अनुचित प्रकार टाळण्यासाठी पोलिसांनी तत्काळ दंगा काबू पथकाला पाचारण केले असून, रुग्णालयात मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. शहर पोलिस निरीक्षक शिवरेकर यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी रुग्णालय परिसराचा ताबा घेतला आहे.
या घटनेनंतर तरुण ज्या खासगी आस्थापनात कार्यरत होता, तिथूनही त्याला कामावरून काढून टाकण्यात आले आहे. देशद्रोही भावना आणि वादग्रस्त स्टेटसमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असून, पोलिस प्रशासनाकडून सखोल तपास सुरू आहे.

भारत-पाक तणावाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. यादरम्यान सोशल मीडियावर युद्धासंदर्भात देशविरोधी आक्षेपार्ह व धार्मिक तेढ निर्माण करणारे व्हिडिओ, पोस्ट आणि राष्ट्रीय एकात्मतेला बाधा पोहोचवणाऱ्या व्यक्तींवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल येणार असल्याचा इशारा प्रशासनासह पोलिसांनी दिला आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर थेट देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

# आयटीआय विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :** जम्मू-कश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तान सीमेवर निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, राज्यातील हजारो क्ळक विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे धडे देण्याची अभिनव योजना राबविण्यात येत आहे. ठाण्यातील राजमाता जिजाऊ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत या शिबिराचे उद्घाटन कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या हस्ते करण्यात आले.

या उपक्रमात अनिरुद्धाज अकॅडमी ऑफ डिझास्टर मॅनेजमेंट आणि कौशल्य विकास विभागाच्या संयुक्त विद्यमाने सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये ऑनलाईन कार्यशाळांचे आयोजन करण्यात येणार आहे.

मंत्री लोढा यांनी सांगितले की, आपत्ती मानव निर्मित असो वा नैसर्गिक, प्रत्येक नागरिकाने आपत्ती व्यवस्थापनाचे आणि बचावाचे प्रशिक्षण घेतले पाहिजे. नव्या पिढीला सजग बनवणे काळाची गरज आहे. यावेळी त्यांनी आयटीआय मध्ये सहा नव्या अभ्यासक्रमांचीही घोषणा केली. कृत्रिम बुद्धिमत्ता (अक), ईव्ही व्यवस्थापन, इंडस्ट्रिअल रोबोटिक्स, थ्रीडी प्रिंटिंग, ड्रोन टेक्नोलॉजी आणि सोलर टेक्निशियन या कोर्सेस आगामी शैक्षणिक वर्षापासून सुरु होणार आहेत.
दोन दिवसीय या शिबिरात अनिरुद्धाज अकॅडमीचे उएड सुनील मंत्री, राज्याचे माजी पोलिस महासंचालक प्रवीण दीक्षित यांचे मार्गदर्शन लाभले. नागरी संरक्षण आणि आपत्कालीन परिस्थितीत बचाव यावर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षणही देण्यात आले.
शिबिरात विद्यार्थिनींनी आपत्कालीन बचाव प्रात्यक्षिके सादर केली. प्रारंभी डॉ. लीना गडकरी यांनी आपत्ती व्यवस्थापनाची संकल्पना स्पष्ट केली. कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य एस. एस. माने यांनी केले आणि उपस्थितांचे आभार मानले.

# वातानुकूलित प्रवासासाठी अद्यापही इलेक्ट्रिक बसेसची प्रतीक्षा

## २ वर्षांपासून इलेक्ट्रिक बस चार्जिंग स्टेशनचे काम, ईबसचा प्रवास लांबला

■ महासागर प्रतिनिधी,
यवतमाळ , दि. ९ :

दोन वर्षांपूर्वी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने इलेक्ट्रिक बस प्रवाशांच्या सेवेत उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार एसटीच्या यवतमाळ विभागालाही २६० इलेक्ट्रिक बसेस मंजूर झाल्या आहेत. पहिल्या टप्प्यात ५२ बसेस मिळणार आहेत. या अनुषंगाने आवश्यक चार्जिंग स्टेशन संदर्भात विजेची जोडणी, पोल उभारणे आदी एसटीच्या अखत्यारित कामे पूर्ण झाली आहेत. आता केवळ विभागाला ई-बस प्राप्त होणेच शिल्लक आहे. दरम्यान, यवतमाळ विभागाने एसटीच्या सेंट्रल कार्यालयाला बसच्या मागणीचा अहवाल सादर केला आहे. परंतु, वरिष्ठ पातळीवर हा प्रश्न रखडला असल्याने यवतमाळच्या प्रवाशांचा ई-बसचा प्रवास लांबला आहे. सुरक्षित प्रवासी हमी देत मोठ्या शहरांसह खेडोपाडी एसटी बसेस पोहोचल्या आहेत. त्यामुळे प्रवाशांचा मोठा ओढा एसटी बसकडे असतो. शिवाय महिला सन्मान योजना, ज्येष्ठ नागरिक अमृत योजना यासह विविध गटांसाठी सवलतीच्या योजना एसटीच्या वतीने राबवण्यात येत असल्यामुळे मोठ्या संख्येने नागरिक एसटीच्या प्रवासाला प्राधान्य देत आहेत. दरम्यान,



खासगी वाहतुकीशी स्पर्धा करत एसटी आपले रूपडे बदलत आहे. प्रवाशांना चांगल्या सुविधा देण्यासाठी विविध उपाययोजना आखण्यात येत आहेत. याच पार्श्वभूमीवर प्रवाशांना वातानुकूलित आणि आरामदायी प्रवास मिळावा, त्याचबरोबर प्रदूषणाला आळा बसावा यासाठी ई-बसेसराज्यभरात चालविण्यात येत आहेत. यवतमाळ विभागालाही २६० बसेस मंजूर झाल्या आहेत.

यातील ५२ बसेस या पहिल्या टप्प्यात मिळणार आहेत. या अनुषंगाने जिल्ह्यातील यवतमाळ, पुसद आणि पांढरकवडा या आगारांमध्ये ई-बसेससाठी आवश्यक चार्जिंग स्टेशन संदर्भात एसटीच्या अखत्यारित असलेली विविध कामे दोन वर्षांपूर्वी सुरू झाली होती.

यामध्ये विजेची जोडणी, पोल उभारणे, चार्जिंग स्टेशनमध्ये मीटरसाठी १० बाय १० च्या रूम, ट्रान्सफार्मरसाठी आवश्यक शेडची उभारणी या कामांचा समावेश होता. . एकदा चार्ज केल्यानंतर २०० कि. मी. धावणार बस बस एकदा चार्ज केल्यानंतर दोनशे ते तीनशे कि. मी. धावते. त्याचप्रमाणे ही पूर्णतः एसी बस असल्यामुळे तिचे भाडे शिवशाहीसारखे राहणार आहे. संपूर्ण बस चार्ज करण्यासाठी तीन तासांचा कालावधी लागतो. हे बघूनच फेऱ्यांचे नियोजन केले जाणार आहे.

# अवैध दारू विक्री बंद करण्याची मागणी



## पोलिस व राज्य उत्पादन शुल्क विभागाला निवेदन

■ महासागर प्रतिनिधी,
खामगाव , दि. ९ :

तालुक्यातील शहापूर येथे अवैधरीत्या सुरू असलेली दारू विक्री बंद करण्यात यावी, अशी मागणी करीत बहुसंख्य महिलांसह ग्रामस्थांनी ६ मे रोजी ग्रामीण पोलिस ठाण्यात धडक देत ठिय्या आंदोलन केले. यावेळी विविध मागण्यांचे निवेदन प्रभारी ठाणेदार विजयकुमार चव्हाण तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाला देण्यात आले.

तालुक्यातील शहापूर येथे देशी, विदेशी व गावठी दारूची खुलेआम विक्री करण्यात येत आहे. त्यामुळे गावात रोज वादविवाद, भांडणे व अशांतता निर्माण झाली आहे. महिलांना घराबाहेर पडताना भीती वाटते. तर तरुण पिढी व्यसनाधीनतेकडे ओढली जात आहे. दारूमुळे गावामध्ये कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न अतिशय गंभीर बनत चालला आहे.

शाळकरी मुला-मुलींपासून्ते वृद्धांपर्यंत सर्वच नागरिकांना या दारू विक्रीचा त्रास सहन करावा लागत आहे. अनेक वेळा स्थानिक नागरिकांनी तक्रार करूनही कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नाही, असा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. दारू विक्रेत्यांचे समर्थन करणाऱ्या काही लोकांमुळे गावातील शांतता भंग होते आहे, असेही ग्रामस्थांनी स्पष्ट केले.

यावेळी महिलांनी गावात दारू नको, अशा घोषणा देत संताप व्यक्त केला. पोलिस प्रशासनाने तत्काळ कारवाई करून दारू विक्री बंद करावी, अन्यथा आंदोलन करण्यात येईल, असा इशारा दिला आहे. निवेदनावर शीलवंत गवई, विवेक तिडके, प्रमोद शिरसाठ, वच्छला शिरसाट, शोभा सुरवाडे, प्रवीण तिडके, रामू अंभोरे, कमलकिशोर तिडके, सुमेध इंगळे, लक्ष्मीबाई तिडके, श्यामसुंदर तिडके, सुरज तिडके, प्रतिभा तिडके, रिना शिरसाट, बेबी तिडके, नितेश तिडके, सचिन तिडके, आनंद तिडके, ज्योती तिडके, सिंधुबाई नितनवरे, संगीता नितनवरे यांच्यासह अनेक महिला व पुरुषांच्या सह्या आहेत.

# आठवड्यात ९ अंशांनी घसरला पारा

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला , दि. ९ :

अकोला अकोला जिल्ह्यात मे महिन्याच्या सुरुवातीलाच पाऱ्याच्या पातळीने ४५ अंश सेल्सियसचा टप्पा गाठलेला होता. दरम्यान वादळी पावसामुळे सलग तिसऱ्या दिवशी पाऱ्यात घसरण नोंदवण्यात आली आहे. शहरात दोन दिवसात कमाल तापमान ३५.५. अंशापर्यंत घसरले असून आठवड्यातच जवळपास ४ अंश सेल्सिअसची घसरण झाली आहे. वाहणाऱ्या वाऱ्यामुळे काही प्रमाणात उकाडा घटल्याने जिल्हावासीयांना दिलासा मिळाला होता. यंदाच्या उन्हाळी हंगामात एप्रिल महिन्यात उन्हाच्या तीव्र झळांचा सामना करावा लागला होता. मे महिन्यात आणखी तप्त वातावरण राहण्याची शक्यता वर्तवली जात होती. मात्र, महिन्यातील प्रारंभ वगळता सुरवात काहीशी दिलासादायक आहे. मंगळवारी शहरात वादळी पावसाने हजेरी लावली. दरम्यान कमाल तापमान ४० आणि किमान तापमान २५ अंश अंश सेल्सिअस असे होते. त्यात घट होऊन बुधवारी अकोल्याचे कमाल तापमान ३४ अंश सेल्सियसच्या आत नोंदवण्यात आले. तर किमान तापमानातही घट कायम होती. दरम्यान सलग तिसऱ्या दिवशी घसरण कायम राहून बुधवारी अकोलाचे कमाल तापमान ३६.६. अंश



सेल्सिअस, तर किमान तापमान २२.६. अंश सेल्सिअस होते. हवामान खात्याने पावसाचा अंदाज वर्तविलेला असताना, भौगोलिक परिस्थितीत बदलामुळे काही प्रमाणात पारा घसरला असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, सोसाट्याच्या वाऱ्यामुळे उकाड्यात घट होण्यास मदत झाली आहे. मात्र, उन्हाळ्याच्या दिवसात अकोलेकरांना गारवा अनुभवायला मिळतो. बुधवारी रात्री आणि गुरुवारी पहाटे हवेमध्ये प्रचंड गारवा होता. पहाटे दुचाकी चालवताना हुडहुडी भरत होती. दोन दिवसाच्या वादळी पावसामुळे शहरातील कुलर, एसी पूर्ण बंद करण्याची वेळ अकोलेकरांवर आली आहे. दरम्यान येत्या ११ आणि १२ मे रोजी वादळी पावसाचा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे. यामुळे अकोलेकरांनी पुन्हा काही दिवस उन्हाच्या तापापासून सुटका मिळाली आहे.

# पालिकेत ध्वनी सहाय्यक स्मार्ट संवाद सेवा

## मोबाइलद्वारे पालिकेच्या तक्रारींसाठी स्वतंत्र उपलब्ध

■ महासागर प्रतिनिधी,
मेहकर, दि. ९ :

नागरिकांना आवश्यक सेवा सहज उपलब्ध करून देण्यासाठी व माहिती मिळण्याची प्रक्रिया सोपी व जलदतेने होण्यासाठी येथील नगर पालिकेत ध्वनी सहाय्यक स्मार्ट संवाद सेवा कार्यान्वित करण्यात आली आहे.

अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करून राज्यात सर्वप्रथम येथील पालिकेतच हा डिजिटल प्रयोग करण्यात आला आहे.

सर्व शासकीय सेवा नागरिकांना सहज उपलब्ध होण्यासाठी अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करून या प्रक्रियेत सुलभता आणण्यासाठी राज्य शासनाने शंभर दिवसांचा कृती आराखडा राबवण्यास प्रारंभ केला आहे. संभाजीनगर येथील न्यूरल वॉल्ट टेक्नॉलॉजी या प्रगत तंत्रज्ञान युक्त कंपनीच्या माध्यमातून मेहकर नगर पालिकेत व्हॉइस चॅट बोट एलईडी इंटरॅक्टिव्ह पॅनल सुरू करण्यात आले आहे. राज्यात नागरिकांना ध्वनी सहाय्यक स्मार्ट संवाद सेवा उपलब्ध करून देणारी मेहकर नगर पालिका ही पहिली पालिका ठरली आहे.

या डिजिटल सेवेमुळे नागरिक मराठीत प्रश्न विचारून नगर पालिकेशी संबंधित सर्व सेवांसंबंधी माहिती सहज मिळवू शकणार आहेत.



आवाजावरून प्रश्न समजाऊन घेऊन ही सिस्टिम लगेच उत्तर देते. सद्यः स्थितीत आर्टिफिशियल इंटलीजीएन्स अर्थात कृत्रिम बुध्दीमत्तेचा वापर करून नागरिकांना विविध सेवा उपलब्ध करून देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

त्याचाच हा एक भाग आहे. नगर पालिकेत दि. ६ मे रोजी या सेवेचा प्रारंभ करण्यात आला. न्यूरल वॉल्ट टेक्नॉलॉजी कंपनीचे संचालक अभिषेक राजगुरे, अजय राऊत, शुभम लोळगे, हर्षल लोळगे यांचा मुख्याधिकारी रामराजे कापरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. नगर पालिका संगणक अभियंता श्रीकृष्ण जैवाळ, अभियंता किशोर ढेपले यांनी योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी तांत्रिक मार्गदर्शन केले. नगर पालिकेच्या सेवांसंबंधी मोबाइलद्वारे तक्रार करण्यासाठी कंपनीने स्वतंत्र पद्वारेही सेवा उपलब्ध करून दिली आहे. कंपनीचे मुख्यालय संभाजीनगर येथे असून, पुणे व लंडन येथे शाखा आहेत.

ही कंपनी राज्यातील महापालिका व नगर पालिकांना भविष्यात अशा प्रकारे ध्वनी सहाय्यक स्मार्ट संवाद सेवा उपलब्ध करून देणार आहे. या डिजिटल क्रांतीचा शुभारंभ मेहकर येथून झाला आहे.

# ई-ऑफिसप्रणाली अंतर्गत सेवा एका क्लिकवर

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला , दि. ९ :

तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून अकोला महापालिका आपले प्रशासकीय कामकाज अधिक सुलभ, कार्यक्षम आणि पारदर्शक बनवत आहे. ई-सेवाप्रणालीचा अवलंब करत प्रशासनाने नागरिकांसाठी सुविधा सहज सोप्या केल्या आहेत. या नव्या बदलामुळे महापालिकेच्या कामकाजाच्या पद्धतीत लक्षणीय सुधारणा होत असून, महापालिकेच्या सेवाही आता फक्त एका क्लिकवर उपलब्ध होणार आहेत.

कागदोपत्री प्रक्रियांवर विराम लावण्यात येत असून, डिजिटल सेवांच्या माध्यमातून प्रशासकीय व्यवस्थापन सुधारण्यावर भर देत असल्याचे महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनील लहाने यांनी सांगितले. अकोला महापालिका आता ई-ऑफिस प्रणालीचा प्रभावी वापर करत आहे. यामुळे परंपरागत कागदोपत्री प्रक्रियांवर अवलंबित्व कमी झाले आहे. आस्थापना विभागापासून ते लेखा विभागापर्यंत सर्वच विभागांनी आपल्या फाइल्सचे डिजिटायझेशन सुरू केले आहे. कागदपत्रे एका टेबलवरून दुसऱ्या टेबलवर नेण्याचा कालावधी कमी झाल्याने निर्णय प्रक्रियेत गती आली आहे. ई-सेवाप्रणालीमुळे



केवळ वेळच नव्हे, तर आर्थिक खर्चातही बचत होत आहे. प्रशासनाला फाइल हाताळणीसाठी आवश्यक असलेले मनुष्यबळ, कागदपत्रांचा खर्च व कार्यालयीन व्यवस्थापनावर येणारा भार लक्षणीय प्रमाणात कमी झाला आहे. शिवाय, डिजिटायझेशनमुळे माहिती जतन करणे आणि आवश्यकतेनुसार झपाट्याने मिळवणे शक्य झाले आहे. प्रशासनिक कार्यवाहीमध्ये दिरंगाई टाळली जात आहे. स्मार्ट गव्हर्नन्स उपक्रमांतर्गत महापालिकेच्या वतीने नागरिकांसाठी फीडबॅक, तक्रार निवारण आणि सूचना प्रणाली सुरू करण्यात येत आहे. नागरिक थेट ऑनलाइन किंवा मोबाइल ॲपद्वारे आपल्या समस्या, सूचना व प्रतिक्रिया नोंदवू शकणार आहेत.

## अवैध वीटभट्ट्यांकडे प्रशासनाचेच दुर्लक्ष

**पुसद :** पुसद शहर व तालुक्यात परवान्याची मुदत संपूनही अनेक वीटभट्ट्या बिनधास्त सुरू आहेत. महसूल प्रशासनाच्या आशीर्वादाने हे कारखाने राजरोसपणे चालू असून, शासनाचा कोट्यवधींचा महसूल बुडत आहे. सामाजिक कार्यकर्त्यांनी याबाबत तक्रारी दाखल केल्या. मात्र महसूल विभागाने कारवाई केली नाही. या वीटभट्ट्यांमध्ये विनापरवाना माती उत्खनन सुरू आहे. यामुळे परिसरात मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे. शाळा, महाविद्यालय परिसरात याचा त्रास विद्यार्थ्यांना सहन करावा लागत आहे. तापमान वाढल्याने आरोग्यावर परिणाम होत आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळानेही याकडे दुर्लक्ष केले आहे. ३१ मार्च २०२५ पर्यंत काही वीटभट्ट्यांना परवानगी होती. मात्र मुदत संपल्यानंतरही ४८ वीटभट्ट्या सुरू आहेत.

## नियंत्रण सुटलेल्या बसमुळे २ कारसह दुचाकीचा अपघात

**पुसद :** पुसद -दिग्रस रोडवर अमरावती पुसद बसने २ कारसह एका दुचाकीला शंभर फूट फरपटत नेले. या अपघातात कुठलीही जीवितहानी झाली नाही. परंतु, दोन्ही कारमधील प्रवासी किरकोळ जखमी झाले. चारही वाहनांचे या अपघातामुळे मोठे नुकसान झाले. पुसद -दिग्रस रोडवरील विठाळा वार्डजवळ सध्या पुलाचे काम सुरू आहे. त्यामुळे पुलावरून एकेरी वाहतूक सुरू आहे. प्रत्यक्षदर्शींकडून मिळालेल्या माहितीनुसार, पुसदकडे संध्याकाळी ६.३०. वाजता बस स्थानकात बस येत असताना विठाळा वार्डातील रिलायन्स पेट्रोल पंपासमोर बसचे नियंत्रण सुटले. त्यामुळे पुस नदीच्या पुलापर्यंत दोन कारला शंभर फूट फरपटत नेले. त्यांच्यासोबत एक दुचाकी देखील फरफटत गेली. या अपघातामुळे अनेकांची तारांबळ उडाली. अपघातात सुदैवाने जीवित हानी टळली, परंतु तासभर वाहतूक खोळंबली. दरम्यान, बसस्थानकात अपघाताची माहिती दिल्यानंतर आगारातील मेकॅनिक दाखल झाले.


**Change Of Name**

I WANT TO CHANGE MY NAME IN MY PASSPORT NO. **G8138817**. MY OLD NAME WAS **TARANNUMBANO USMANKHAN PATHAN.** NOW MY NEW NAME IS **TARANNUM FAROOKH HASSAN ANSARI.**
**ADD** : PLOT NO 42 PROCESS SOCIETY BESA NAGPUR - 440037

MY OLD NAME WAS **SARIKA SURESH CHANNE.** NOW MY NEW NAME IS **SHOBHA SHANKAR TULE.**
**ADD :** PLOT NO.63,NEW AMAR CHIKHLI LAYOUT, NEAR TULE AATA CHAKKI, BESA, NAGPUR - 440034

MY OLD NAME WAS **JOTSNA.** NOW MY NEW NAME IS **JYOTSANA VILAS KAREKAR.**
**ADD** : 11 PIONEER ORION TRIMURTI NAGAR NAGPUR-440022


# उदयनगरात अवकाळी पावसाची हजेरी

## काही भागांत वीजपुरवठा खंडित

■ महासागर प्रतिनिधी,
उदयनगर , दि. ९ :

शहर व परिसरात अवकाळी पावसाने हजेरी लावली. त्यामुळे काही दिवसांपासून वाढत्या उष्णतेमुळे त्रस्त झालेल्या नागरिकांना दिलासा मिळाला. शहर व परिसरात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाने हजेरी लावली. काही भागांमध्ये सरींचा जोर अधिक होता. काही वेळानंतर या पावसाने विश्रांती घेतली. मात्र, चार वाजेदरम्यान वादळी वाऱ्यासह पुन्हा जोरदार पाऊस झाला. अचानक झालेल्या या पावसामुळे नागरिकांची तारांबळ उडाली. या पावसामुळे उदयनगरसह परिसरातील काही भागांत वीजपुरवठा खंडित झाल्याचे वृत्त आहे. या पावसामुळे तापमानात लक्षणीय घट होऊन वातावरणात गारवा निर्माण झाला.

हवामान विभागाने ढगाळ वातावरण आणि हलक्या पावसाची शक्यता वर्तवली होती, ती आज प्रत्यक्षात उतरली. पुढील दोन ते तीन दिवस असेच वातावरण राहण्याची शक्यता असून, काही भागांत हलक्या



सरी कोसळण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. दरम्यान, हंगाम पूर्व शेतीच्या तयारीत असलेल्या शेतकऱ्यांना या अवकाळी पावसाच्या सरींचा फायदा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अशा शेतकऱ्यांसाठी हा पाऊस आशेचा किरण ठरू शकतो, असे सांगितले जात आहे.

हवामान खात्याने येत्या चार दिवस वादळी वा-यासह्अवकाळी पावसाचा अंदाज व्यक्त केला होता. जिल्ह्यात सलग दोन दिवसांपासून वादळी वा-यासह्अवकाळी पाऊस पडत आहे. बुलडाणा शहरात जोरदार वादळी वारा सुटला. येथील प्रशासकीय इमारतीत उभी असलेल्या कारवर भले मोठे गुलमोहराचे झाड पडल्याने कारचे मोठे नुकसान झाले आहे. सुदैवाने वर्दळीच्या या ठिकाणी मनुष्य नसल्याने मोठी दुर्घटना टळली आहे. बुलडाणा येथील प्रशासकीय इमारतीत भारतीय रेल्वेचा रिझर्व्हेशन काउंटर आहे. या ठिकाणी कार्यरत गुल्हाने आपली कार घेवून दुपारी काउंटरवर आपल्या कार्यावर आले होते. त्यांनी आपली कार प्रशासकीय इमारतीतील मोकळ्या जागेत झाडाखाली उभी केली होती. अशातच सायंकाळी वाजेच्या सुमारास जोरदार वारा सुटला. त्यामुळे गुलमोहराचा एक मोठा झाड मुळासकट कारच्या बोनेटवर उन्मळून पडल्याने कारचे मोठे नुकसान झाले.

# ५७ रेड्यांची तस्करी करणारा कंटेनर अखेर पकडला

## घाटंजी पोलिसांची कारवाई, ३५ लाख रुपयांचा माल हस्तगत

**घाटंजी :** तेलंगणा आणि आंध्रप्रदेश राज्यात कंटेनरमध्ये जनावरे कोंबून नेणाऱ्या आंतरराज्यीय टोळीचा पर्दाफाश करण्यात घाटंजी पोलिसांना यश आले. ही कारवाई बुधवारी करण्यात आली. दोघांना अटक करत ३५ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तय्यब अब्दुल मजीद पठाण (वय ३० वर्षे, रा. घसेरा, जि. मेवात, हरियाणा) आणि सुफयान फजलू रहेमान कुरैशी (वय २४ वर्षे, रा. केतीपुरा, जि. बागपत, उत्तर प्रदेश) अशी ताब्यात घेतलेल्या दोघांची नावे आहेत. या प्रकरणी पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, यवतमाळवरून घाटंजीकडे येणारे कंटेनर वाहन क्रमांक आर-जे-११जीसी-७३४२ज्यामध्ये अवैधरीत्या जनावरांची वाहतूक होत असल्याची घाटंजी पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली. त्यावरून घाटंजी जवळच खापरी गावाजवळ पोलिसांनी सापळा रचला. नाकाबंदी करून यवतमाळवरून येणाऱ्या कंटेनर वाहनाला थांबवले. वाहन चालकास विचारपूस केली असता, उडवाउडवीचे उत्तर दिले. पोलिसांनी वाहनाची तपासणी केली असता, अवैधरित्या ५७ जनावरांची तस्करी होत असल्याचे दिसून आले.

त्यावेळी सदर वाहनासह पोलिसांनी तय्यब अब्दुल मजीद पठाण आणि सुफयान फजलू रहेमान कुरैशी या दोघांना ताब्यात घेऊन अटक केली. आरोपींविरूद्ध कलम ११ (१)(घ).(ड).(ज) प्राणी क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम १९६० सह कलम ८३/१७७ मोटार वाहन कायदा सह ३(५) गुन्हा नोंद करण्यात आला. ही कारवाई पोलिस निरीक्षक निलेश सुरडकर, दिनेश जाधव, मुकेश करपते, विनोद मेश्राम, अमितकुमार लोखंडे यांनी पार पाडली. पोलिसांची वेळीच सतर्कता मुरा जातीचे ५७ रेडे क्रूरपणे आखूड दोरीने बांधून त्यांच्या चारा-पाण्याची कुठलीही व्यवस्था केलेली नव्हती. या जनावरांना वाहनात उभे राहण्याची जागा नसताना सुद्धा निर्दयतेने बांधून नेत असताना मिळून आले. पोलिसांच्या सतर्कतेमुळे या ५७ जनावरांची सुटका करण्यात आली. ५७ जनावरांची अंदाजे किंमत ५ लाख ७२ हजार असून कंटेनर ३० लाख रुपयांचा असा एकूण ३५ लाख ७२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.


**कार्यालय**
**ग्राम पंचायत किरमिटी भारकस**
**पंचायत समिति हिंगणा , जिल्हा परिषद नागपूर**
**अंतर्गत विविध योजनेतील बांधकाम, पाणीपुरवठा व दिवाबत्ती**
**कामाकरिता लागणारे साहित्य**
**सूचना क्रमांक -०१**

**सन -२०२५-२६ (ई-निविदा) (पहिली वेळ)**

**ग्रा .पं. किरमिटी भारकस** अंतर्गत करिता लागणारे साहित्य खरेदी करण्याकरिता जिल्हा परिषद वेबसाईटवर http://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर ईविविदा- प्रसिद्ध करण्यातयेत आहे.

| अ.क्र. | तपशील | दरपत्रक विक्रीचा कालावधी दिनांक व दरपत्रक स्वीकुतीचा अंतिम दिनांक | दरपत्रक उघडण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १. | सन २०२५-२६ अंतर्गत विविध योजनेतील बांधकाम,पाणीपुरवठा व दिवाबत्ती साहित्य खरेदी करण्यकरीता ई-निविदा ऑनलाईन करण्यात येत आहे | दिनांक ०८/०५/२०२५ ला दुपारी १२.०० ते १३/०५/२०२५ ला दुपारी ०३.०० वा पर्यत उपलब्धराहील. | दिनांक १४/०५/२०२५ ला दुपारी ०३.०० च्या नंतर उघडण्यात येईल. |

स्वा.
सरपंच सचिव
ग्राम पंचायत **किरमिटी भारकस**
पंचायत समिती हिंगणा जिल्हा नागपूर

# यांचे इमान कोणाशी?

आजवर भारताने अनेक आतंकवादी हल्ले सहन केले आहेत. प्रत्येक हल्यानंतर 'भारताने पाकिस्तानला जन्माची अद्दल घडवावी', 'पाकव्याप्त काश्मीर ताब्यात घ्यावा', 'आतंकवाद्यांना मदत करणाऱ्या स्थानिकांवर देशद्रोहाचा खटला भरावा' यांसारख्या प्रतिक्रिया देशातील नागरिकांमध्ये स्वाभाविकपणे उमटतात.

पूर्वी व्यक्त होण्याची माध्यमे मर्यादित होती. आता व्यक्त होण्यासाठी सोशल मीडियाचे अनेक प्लॅटफॉर्म्स लोकांसमोर विनामूल्य उपलब्ध आहेत. २०१४ नंतर देशात झालेले सत्तांतर, सोशल मीडियाचा वाढत चाललेला वापर, देशातील नागरिकांवर विशेषतः तरुणांवर वाढलेला धर्म आणि राष्ट्रप्रेमी विचारांचा प्रभाव यांमुळे अशा घटनानंतर व्यक्त होण्याचे प्रमाण पूर्वीच्या तुलनेत कैक पटीने वाढले आहे.

राष्टप्रेमी जनतेचा हा रोष पुलवामा हल्याच्या वेळीही मोठ्या प्रमाणात दिसून आला. ज्याचा परिणाम म्हणून सरकारला पाकिस्तानवर सर्जिकल स्ट्राईक करून जनतेला आश्वस्त करावे लागले. आजपर्यंत देशावर झालेल्या आतंकवादी हल्यांच्या तुलनेत पहलगाम येथील हल्ला थोडा वेगळा यासाठी आहे. कारण या हल्याचे दायित्व आजतगायत कोणत्याही आतंकवादी संघटनेने घेतलेले नाही.

दुसरी बाब म्हणजे या हल्यात आतंकवाद्यानी ज्यांना लक्ष केले ते हिंदू आहेत ना याची नीट खात्री करून केवळ त्यांनाच त्यांच्या बायको मुलांच्या समोर गोळ्या घातल्या गेल्या. त्यामुळे आतंकवादाला धर्म नसतो हे आजपर्यंत पसरवण्यात आलेले नरेटिव्ह पूर्णतः खोटे सिद्ध झाले. केवळ देशातच नव्हे तर आजतागायत जगभरात जे काही आतंकवादी हल्ले झाले आहेत त्यातील बहुतांश हल्ले हे एकाच पंथाच्या आतंकवाद्यांनी केले आहेत. त्यामुळे आतंकवादाला धर्म नसतो असे कसे म्हणता येईल ?

ऑगस्ट २०२४ मध्ये बांगलादेशात निर्माण झालेली अराजकसदृश्य परिस्थिती आजतागायत कायम आहे. मागील आठ महिन्यांत बांगलादेशातून हजारो हिंदूंना आपले घरदार, जमीन जुमला सोडून पलायन करावे लागले आहे. कित्येक हिंदूंना मारहाण करून त्यांची हत्या करण्यात आली, हिंदूंच्या बाया-बापड्यांवर अत्याचार करण्यात आले, हिंदूंची शक्तिस्थाने असलेली मंदिरे आणि त्यांतील देवतांच्या मूर्ती फोडण्यात आल्या. बांगलादेशच्याच पावलावर पाऊल ठेवत पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबाद येथील हिंदूंनाही स्थानिक शांतीप्रिय समाजाने त्यांच्या राहत्या घरातुंन बाहेर काढून राज्य सोडन्यास भाग पाडले.

बांगलादेश आणि मुर्शिदाबाद येथील घटना ताज्या असतानाच पहलगाम येथील आतंकवादी हल्यात केवळ हिंदूंनाच लक्ष केले गेल्याने देशभरातील समस्त हिंदू समाजात प्रचंड रोष निर्माण झाला आहे, हा रोष विविध पद्धतीने व्यक्त केला जात आहे.

मुबईतील सांताक्रुज येथील काही राष्ट्रप्रेमी नागरिकांनी हा रोष व्यक्त करताना पाकिस्तान, बांगलादेश आणि पॅलेस्टाईन यांच्या झेंड्यांचे चित्र असलेल्या भित्तिपत्रकांवर 'मुर्दाबद' असे लिहून ही पत्रके परिसरातील भिंतींवर लावली ज्यामुळे तेथील शांतीप्रिय समाजातील काही लोकांनी ही भित्तीपत्रके फाडून हिंदू तरुणांशी वाद घालण्याचा आणि दंगल घडवण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्याने त्यांच्या मनसुब्यावर पाणी फेरले गेले.

बहुसंख्य हिंदू असलेल्या भारतात पाकिस्तानचा निषेध करणे गुन्हा आहे का असा सवाल आता राष्ट्रप्रेमी जनतेकडून विचारला जात आहे. ज्या बांगलादेशने आणि पाकिस्तानने आजतागायत भारताच्या विरोधात कुरघोड्या करण्यात आणि भारतात आतंकवादी कारवाया करण्यात धन्यता मानली आहे.

ज्यांनी देशाच्या सीमेवर आजपर्यंत शेकडो निरपराध भारतीय सैनिकांना गोळ्या घालून ठार केले आहे अशा पाकिस्तानचा भारतात निषेध का करू नये? कर्नाटकातील कलबुर्गी येथेही हाच प्रकार घडला. पाकिस्तानचा निषेध म्हणून रस्त्यावर लावलेले पाकिस्तानचे झेंडे तेथील शांतीप्रिय समाजातील महिलांनी अत्यंत आदरपूर्वक काढले. भारतात राहून, भारतीय लोकशाहीने दिलेल्या सुख सुविधा उपभोगून, भारतात रोजीरोटी कमवून येथे भयमुक्त जीवन जगून ज्यांना पाकिस्तानचा निषेध केला म्हणून पोटशूळ उठतो. अशांचे इमान नक्की भारताशी आहे की पाकिस्तानशी याचा तपास का घेतला जात नाही ?



पाकिस्तानचा निषेध केला म्हणून ज्यांना संताप येतो आणि या निषेधाचा विरोध करण्यासाठी जे रस्त्यावर उतरून जाब विचारतात, समाजात दंगल भडकवण्याचा प्रयत्न करतात अशा समाजद्रोह्यांना का पाठीशी घातले जात आहे?

ज्या औरंगजेबाने स्वराज्याचे धाकले धनी छत्रपती संभाजी महाराज यांना हालहाल करून ठार मारले त्या औरगजेबाच्या नावाने असलेल्या शहराचे नाव बदलण्याचा निर्णय जेव्हा राज्य सरकार घेते तेव्हा त्याला विरोध करण्यासाठी हजारो जण रस्त्यावर उतरतात. सरकारने हा निर्णय मागे घ्यावा यासाठी त्यांचे लोकप्रतिनिधी जाहीररीत्या रोष प्रकट करतात. महाराष्ट्रात राहून छत्रपती संभाजी महाराज नव्हे तर औरंगजेब ज्यांना जवळचा वाटतो अशांचा आदर्श कोण आणि यांचे इमान कोणाशी आहे याची पोलीस चौकशी का केली जात नाही?



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

स्वराज्यावर आलेल्या अफजलखानरूपी संकटाने स्वराज्यातील अनेक मंदिरे नेस्तनाबूत केली, तुळजापुरातील भवानी मातेची मूर्ती फोडली, पंढरपुरातील पांडुरंगाच्या मंदिरावावरही तो चाल करून गेला, हजारो हिंदूंच्या कत्तली केल्या, अनेक हिंदू बाया नासवल्या.

अशा संकटाचा सामना शक्तीने नव्हे तर युक्तीने करण्याचा निर्णय छत्रपती शिवाजी महाराजांनी घेतला. स्वराज्यावर आलेल्या संकटाला स्वराज्यातच गाडला. धूर्त आणि कपटी अफजलखानाला महाराजांनी प्रतापगडावर लोळवला. अफजलखानवध हे प्रकरण म्हणजे महाराष्टाच्या इतिहासातील सोनेरी पान. आतंकवादाचा सामना कसा करावा याचे जिवंत उदाहरण; मात्र अफजलखानवधाचे पोस्टर लावले म्हणून मिरजेत दंगल उसळते आणि तत्कालीन सरकार या अफजलखान वधाच्या चित्रावरच अघोषित बंदी घालते, इतिहासाच्या पुस्तकातील अफजलखानवधाचे चित्र हटवले जाते.

ज्या ज्या ठिकाणी हे चित्र उभारले जाते त्याविरोधात एका वर्गाकडून पोलिसांत तक्रारी दाखल केल्या जातात आणि पोलिससुद्धा हे चित्र काढून टाकण्याचे आदेश देतात. शिवरायांच्या महाराष्ट्रात शिवरायांचा पराक्रम दाखवल्यामुळे ज्यांच्या भावना दुखावतात अशांच्या भावना नक्की कोणाशी जोडल्या गेल्या आहेत याची चौकशी कोण करणार?

१९९३ च्या मुंबई बॉम्बस्फोटातील प्रमुख आरोपी याकूब मेमन याला जुलै २०१५ मध्ये फासावर लटकवण्यात आले. त्याची अंत्ययात्रा मुंबईतुन काढण्यात आली तेव्हा त्या अंत्ययात्रेत त्याच्या समाजाचे लाखो लोक सहभागी झाले होते. याकूब मेमन हा कोणी क्रांतिकारी किंवा सेलिब्रेटी नव्हता तर शेकडो निरपराध्यांचे जीव घेणाऱ्या बॉम्बस्फोट मालिकेतील मुख्य आरोपी होता. एका देशद्रोही आरोपीच्या अंत्ययात्रेला येणाऱ्या लाखो लोकांचे इमान कोणाशी होते याची चौकशी त्यावेळी का केली नाही?

कोणताही आतंकवादी हल्ला हा स्थानिकांच्या मदतीशिवाय होऊच शकत नाही. पहलगाम येथे झालेला हल्ला सुद्धा स्थानिकांच्या मदतीनेच करण्यात आला होता याचे पुरावे प्रत्यक्षदर्शींनी दिले आहेत, तशा स्वरूपाचे व्हिडीओजही आज सोशल मीडियातून फिरत आहेत, असे असताना तेथील स्थानिकांची चौकशी करण्याऐवजी त्यांना देशभक्त दाखवण्याची चढाओढ करणाऱ्या राजकारणी आणि वृत्तवाहिन्यांचे ईमान कोणाशी आहे याची चौकशी कधी केली जाणार आहे?

भारताने पंथनिरपेक्ष राज्यप्रणाली स्वीकारली आहे त्यामुळे याठिकाणी सर्वच जातीधर्माचे लोक गुण्यागोविंदाने नांदत आहेत, त्यांचे धार्मिक विधी, सण-उत्सव उत्साहाने साजरे करत आहेत. बहुसंख्य हिंदूही अल्पसंख्य समाजाच्या सुख दुःखात नेहमीच सहभागी होत असतात. अल्पसंख्य समाजाच्या अधिकारांचे रक्षण करण्यासाठी भारतात स्वतंत्र कायदे आणि मंत्रालय आहे.

अश्फाकउल्ला खान सारख्या राष्ट्रभक्त मुसलमानांचा भारतीयांनी नेहमीच आदर केला आहे. राष्ट्रपतीच्या योगदानाबद्दल डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना भारताने देशाच्या सर्वोच्च पदावर विराजमान केले होते. झाकीर हुसेन, बिस्मिल्लाह खान यांसारख्या महान कलाकारांच्या कलेतील योगदानाचा भारताने विविध सन्मान बहाल करून नेहमीच गौरव केला आहे.

येथील हिंदूंच्या प्रत्येक सांस्कृतिक कार्यक्रमात बिस्मिल्लाह खान यांच्या सनईची धून आजही वाजवली जाते. सैन्य आणि पोलीस दलात देशासाठी जीवावर उदार होऊन सेवा बजावणाऱ्या मुसलमान देशभक्तांचा देशातील नागरीकांनी नेहमीच गौरव केला आहे. त्यामुळे ज्यांचे इमान या देशाशी आणि येथील मातीशी जोडले गेले आहे त्या सर्वांनाच बहुसंख्य हिंदू समाज नेहमी हृदयात स्थानापन्न करतो. ■ ■

# भारताचे चोख प्रत्युत्तर!



अभय गोखले

पहलगाम मधील अतिरेकी हल्ल्यानंतर, भारताने पाकिस्तानमधील दहशतवाद्यांचे अड्डे असलेल्या काही ठिकाणांवर मिसाईलच्या सहाय्याने हल्ले करून पाकिस्तानला चोख उत्तर दिले आहे. महत्वाचे म्हणजे हे हल्ले पाकिस्तानची सीमा न ओलांडता भारतीय भूमीवरून केल्याने, पाकिस्तानची कोंडी झाली आहे. भारताने मिसाईल हल्ले हे पाकिस्तानच्या नागरी वस्तीवर किंवा पाकिस्तानच्या लष्करी सुविधांवर न केल्याने पाकिस्तानला आंतरराष्ट्रीय स्तरावर बोंबाबोंब करण्याची संधी मिळणार नाही.

भारताने पाकिस्तानमधील ९ ठिकाणांवर हल्ले केले, ज्या ठिकाणी दहशतवाद्यांचे अड्डे असल्याची भारताला खात्री होती. पाकिस्तान मधील बहावलपूर, ज्या ठिकाणी जैश ए मोहंमद या अतिरेकी संघटनेचे मध्यवर्ती कार्यालय आहे. तसेच मुरिदके या ठिकाणी लष्कर ए तय्यबा या दहशतवादी संघटनेचे मुख्यालय आहे. या दोन ठिकाणांवर हल्ले करुन भारताने पाकिस्तानस्थित दहशतवादी संघटनांना निर्वाणीचा इशारा दिला आहे.

मिसाईलच्या सहाय्याने हल्ले करून भारताने दाखवून दिले आहे की पाकिस्तानच्या दहशतवादी कारवायांना भारत जशास तसे उत्तर देईल. पाकिस्तानला धडा शिकवताना, भारताने या गोष्टीची खबरदारी घेतली की या हल्ल्याचे पूर्ण युद्धामध्ये रूपांतर होणार नाही. याचे कारण फुल स्केल वॉर याक्षणी भारताच्या फायद्याची नाही. पाकिस्तानची अर्थव्यवस्था ही आधीच दिवाळखोरीत गेलेली आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात युद्ध झाल्यास त्यांच्याकडे गमावण्यासारखे काही नाही.

मात्र भारताचे तसे नाही. फुल स्केल वॉर झाल्यास भारताच्या उभरत्या अर्थव्यवस्थेवर त्याचा विपरीत परिणाम होऊ शकेल आणि त्या आर्थिक संकटातून बाहेर पडण्यासाठी भारताला बराच काळ वाट पाहावी लागेल. पाकिस्तानला चीनची फूस आहे, ही गोष्ट लपून राहिलेली नाही. पाकिस्तान आणि भारत यांच्यात मोठ्या प्रमाणात युद्ध झाले तर ते चीनला हवेच आहे, कारण त्यामुळे भारताची अर्थव्यवस्था खिळखिळी होईल याची चीनला जाणीव आहे.

ऑपरेशन सिंदूर अंतर्गत भारताने जी कारवाई केली त्या अगोदर काही तासच, इंग्लंड आणि भारत यांच्यात एक महत्त्वाचा व्यापार करार करण्यात आला तो अर्थातच चीनचे नुकसान करणारा आहे. तसेच अमेरिका आणि युरोपीयन युनियन यांच्याबरोबरील भारताचे व्यापार करार चीनला धक्का पोहोचवणारे आहेत. ऑपरेशन सिंदूर अंतर्गत भारताने जी कारवाई केली त्यामुळे पाकिस्तानला जरब बसली असली तरी पाकिस्तानच्या दहशतवादी कारवायांना पूर्णपणे लगाम बसेल असे मानण्याचे कारण नाही.

पाकिस्तानला खरा धडा मिळणार आहे तो सिंधु जल करार स्थगित केल्यामुळेच. भारताने लवकरात लवकर धरणे बांधली आणि कालवे खोदले तर पाकिस्तानकडे वाहून जाणारे पाणी भारताला मोठ्या प्रमाणात साठवता येईल आणि भारतातील दुष्काळग्रस्त राज्यांकडे वळवता येईल. सर्वात महत्वाचे म्हणजे पाकिस्तानने कुरापत काढली की त्याला धडा शिकविण्यासाठी भारताला ताबडतोब पाकिस्तानचे पाणी बंद करता येईल आणि पाकिस्तानला शरण आणता येईल. ■ ■ ■

# शिक्षकी पेशा!

शिक्षक असे म्हटले, की डोळ्यासमोर गुरुर्ब्रहा, गुरुर्विष्णू, गुरुदेवो महेश्वरः वगैरे वगैरे तरळून जाते. आपल्या भारतीय संस्कृतीत, शिक्षकह्ण म्हणजे शिक्षण देणारा, एव्हढाच फक्तअर्थ नाही! कारण जो शिक्षक असतो तो शिकवीत असतो. नुसती माहिती देत नसतो, तर त्या क्षेत्रातील ज्ञान देत असतो.

आपल्या प्राचीन संस्कृतीत, 'TEACHER' नावाची संकल्पनाच नाही. कारण केंब्रिज डिक्शनरी मध्ये 'TEACH' चा अर्थ अनुवाद करणे, माहिती देणे असा आहे. म्हणजे जो व्यक्ति अनुवाद करतो, माहिती देतो, तो 'TEACHER' ! तो शिक्षण देणारा नव्हे.

पूर्वार्ध

डॉ. अविनाश प. परांजपे
ए 2/ जी 7,
रचना आनंदवन सोसायटी
वानाडोंगरी, नागपूर.

मूलतः एखाद्या गोष्टीची माहिती असणे आणि त्या गोष्टीचे ज्ञान असणे ह्यात जमीन आसमानाचा फरक आहे. पण आजकालच्या तथाकथित संगणक युगात ह्य माहिती म्हणजेच ज्ञान असा समज पसरला आहे. म्हणूनच "INFORMATION TECHNOLOGY" उर्फ IT, ज्याला आपण मराठीत माहिती तंत्रज्ञानह्ण म्हणतो, त्यालाच लोक महत्व देत आहेत.

परंतु माहिती ही केवळ संकलित तपशीलावर म्हणजेच INFORMATION" ही नुसती "DATA" वर आधारित असते. परंतु ज्ञान हे माहितीच्या बरोबरच कौशल्यावर आधारित असते. ज्याला आपण INFORMATION+SKILLS' म्हणतो. नुसती माहिती असुन उपयोग नाही, तर त्या माहितीचा केव्हा, कधी,कश्यासाठी व कसा उपयोग करावा याची समज म्हणजेच ज्ञान.

तर मुख्य मुद्दा असा की, आजकाल, सर्वच नाही, पण बहुतांशी असे आढळते की, अमुक अमुक व्यक्ती फलाण्या फलाण्या विद्यालयात किंवा महाविद्यालयात TEACHER"च असतात. शिक्षक नसतात. त्या व्यक्ती फक्त दिलेले 'SYLLABUS' हे ठरविलेल्या पुस्तका प्रमाणे विद्यार्थ्यांना नव्हे तर मार्कार्थ्यांना मी (परीक्षार्थ्यांना, हा शब्द सुद्धा योग्य मानत नाही.) घोकायला लावतात.

मी माझ्या समोरचे उदाहरण सांगतो, माझ्या जवळच्या व्यक्तीच्या पहिल्या वर्गातील मुलाची टिचर पालकांकडे तक्रार करत होती की, तुमच्या मुलाने एक वीक झाला, अजूनही ट्विंकल ट्विंकल लिटिल स्टार ही पोएम लर्न केलेली नाही. मी विचारले, मॅडम तुम्ही शिकविलीत का? ती म्हणाली रोज क्लास मध्ये 5-5 वेळा टिच केली आहे. त्यावर माझा प्रश्नहोता की, मग मुलांना ट्विंकलिंग, म्हणजे काय? लिटिल म्हणजे काय?व स्टार म्हणजे काय? हे समजले असेल ना? त्यावर त्यांचंउत्तर असे, की आम्ही फक्त लर्न करून घेतो, पहिलीत मीनिंग नाही असत! मग लर्नचा अर्थ काय? तर म्हणे पाठ करून घेणे. दूसरा माझ्या पुतण्याचा मुलगा, दहावीत! मी त्याच्या घरी गेलो तेव्हा तोंडाने रट्टा मारत होता. Newton's first law, states that -- मी विचारताच कळले की त्याला हा न्यूटनचा पहिला नियम समजलाच नव्हता, फक्त पाठ करणे व मार्क मिळवणे. बस्स एव्हडेच ध्येय!

तिसरे उदाहरण उच्च शिक्षणाचे. एका अभियांत्रिकी महाविद्यालयाचे श्रीमान प्राध्यापक, नुकतेच सेवा निवृत्त झालेले, मला विचारात होते, यार, मी तुला दोस्त म्हणुन विचारतो, मी मुलांना आयुष्यभर शिकविले, पुस्तका प्रमाणे! पण तू इंडस्ट्री वाला आहेस म्हणुन मला सांग, हे पावर फॅक्टर, करंट लॅगींग व लिडिंग नक्की काय असते? कसे होते? मी म्हंटले, अरे तू लॅब मध्ये करून पहायचे ना? तर त्याचे उत्तर असे, मला हाय वोल्टेजची भीती वाटते.

मला सांगा असला प्राध्यापक शिक्षक आहे का? हा जो शिक्षण क्षेत्रात प्रकार सुरू आहे, त्याने शिक्षणाचा दर्जा पार घसरला आहे ! यास कारणीभूत त्या वेळेचे सरकार आहे, ज्या वेळेपासून शिक्षण संस्था नावाचा धंदा सुरु झाला! आज आपणास दिसून येते की जवळपास प्रत्येक राजकरण्याने, नेतागिरीला आणखी एक जोड धंदा म्हणून शिक्षण संस्था काढल्या आहेत.

(उर्वरीत भाग उद्याच्या अंकात)

■ ■ ■



# माठातील पाणी वरदान

रेफ्रिजरेटरच्या युगातही मातीच्या भांड्यांची क्रेझ संपलेली नाही. ते पाणी नैसर्गिकरित्या थंड ठेवतेच, शिवाय ते आरोग्यासाठी फायदेशीर आहे.

भारतात शतकानुशतके मातीच्या भांड्यात किंवा घागरीत पाणी साठवण्याची परंपरा आहे. मातीच्या भांड्यांमध्ये साठवलेले पाणी प्लास्टिकच्या बाटल्यांमध्ये साठवलेल्या पाण्यापेक्षा स्वच्छ आणि सुरक्षित असते. इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च आणि नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ न्यूट्रिशन देखील मातीच्या भांड्यांचा वापर सर्वात सुरक्षित आणि फायदेशीर मानतात.

मातीच्या भांड्यांमध्ये लहान छिद्रे असतात. जेव्हा पाणी या छिद्रांमधून झिरपते आणि पात्राच्या बाह्य पृष्ठभागावर पोहोचते तेव्हा ते बाष्पीभवन होऊ लागते. ही एक एंडोथर्मिक प्रक्रिया आहे. पाणी भांड्यातून आणि त्यातील पाण्यामधून उष्णता घेते. या प्रक्रियेद्वारे भांडे आणि पाणी हळूहळू थंड होते.

माती नैसर्गिकरित्या अल्कधर्मी असते. म्हणून, मातीच्या भांड्यात ठेवलेले पाणी शरीराच्या पीएच पातळीला संतुलित करण्यास मदत करते. यामुळे अहॅसिडिटी आणि गॅस सारख्या समस्या कमी होतात. द्रव किती आम्लयुक्त आहे हे स्त्रल्र पातळी दर्शवते. मातीच्या भांड्यातील पाणी नैसर्गिकरित्या थंड असते, जे पिल्याने घशात झटका येत नाही आणि शरीराचे तापमान देखील राखले जाते. ,

■ ■ ■

# महापुरुषांच्या नावाने स्वार्थ खरी जागा दाखवणार कोण?

महापुरुषांचा सन्मान म्हणजे केवळ त्यांची जयंती आणि पुण्यतिथी साजरी करणे नव्हे. त्यांच्या विचारांचे खरे अनुकरण करणारेच त्यांचे खरे अनुयायी असतात. पण आज समाजात बऱ्याच लोकांनी महापुरुषांचे नाव केवळ स्वतःचे स्वार्थ साधण्यासाठी वापरण्याचा एक विकृत प्रवाह निर्माण केला आहे.

ते लोक समाजाला भ्रमात ठेवतात, भावनिक ब्लॅकमेल करतात आणि स्वतःसाठी आर्थिक, सामाजिक आणि राजकीय लाभ मिळवतात. हे सत्य समाजाने ओळखले पाहिजे आणि अशा लोकांना वेळीच त्याची जागा दाखविली पाहिजे.

महापुरुषांचे विचार, त्यांचे तत्त्वज्ञान आणि त्यांच्या संघषार्तून उभा राहिलेला समाज आज नेमका कुठे आहे? महापुरुषांचा जयजयकार करणारे लोक काय करत आहेत? अनेकांना हे माहिती आहे की, काही लोक महापुरुषांच्या नावाच्या आडमार्गाने स्वतःसाठी संपत्ती कमावतात, राजकीय लाभ घेतात, आणि समाजाला मूर्ख बनवतात.

काही लोक स्वतःला मोठे समाजसेवक, नेते, किंवा समाजहितैषी म्हणवतात, पण त्यांची हाव, त्यांचा भ्रष्टाचार आणि त्यांचा स्वार्थ समाजाच्या प्रगतीसाठी घातक ठरतो.

अशी लोक महापुरुषांचे नाव फक्त भाषणात आणि जाहिरातींमध्ये वापरतात या लोकांना महापुरुषांचे तत्त्वज्ञान कळत नाही, पण त्यांच्या नावावर मोठे मोठे कार्यक्रम करायचे असतात.

समाजासाठी काहीही न करता हे लोक गाजावाजा करून समाजाला मूर्ख बनवतात. महापुरुषांचे नाव घेऊन स्वतःला मोठे सिद्ध करून लोकांच्या भावनांशी खेळणे हा त्यांचा मुख्य धंदा असतो. प्रसंगी या लोकांनी महापुरुषांच्या नावाचा फायदा घेत, सत्ता सुद्धा संपादित केलेली आहे. हे लोक समाजाची सेवा करण्याच्या नावाखाली राजकीय फायद्यासाठी दिखावा करतात आणि तो स्वार्थ साध्य झाल्यावर सामान्य माणसाचा विचारही करत नाहीत.

समाजासाठी लढत असल्याचे म्हणणारे हे लोक आपल्या कुटुंबासाठी कोट्यवधींची संपत्ती गोळा करतात, धनसंपत्ती गोळा करून विलासी जीवन जगतात आणि समाज मात्र तसाच दारिद्र्यात दुर्लक्षित राहतो. महापुरुषांच्या विचारांचे अनुकरण करणाऱ्यांना हे लोक संपवण्याचा प्रयत्न करतात आणि नवा विचार येऊ नये यासाठी जनतेला चुकीच्या माहिती देऊन समाजाला अंधारात ठेवतात. हे या लोकांमध्ये असलेले दुर्गुण आहेत.

जर आज आपण गप्प राहिलो, तर उद्या आपल्या पुढच्या पिढ्यांना महापुरुषांचा खरा इतिहास कळणार नाही. त्यांचे नाव फक्त राजकीय आणि आर्थिक स्वाथार्साठीच वापरले जाईल. त्यामुळे, आता वेळ आली आहे अशा संधीसाधू लोकांचा पदार्फाश करण्याची. जोपर्यंत सामान्य जनता अशा भंपक लोकांना त्यांच्या जागी बसवत नाही, तोपर्यंत समाजाच्या नशिबात फक्त फसवणूकच आहे.

आता प्रत्येक सुज्ञ नागरिकाने महापुरुषांच्या नावाने निव्वळ राजकारण करणाऱ्या लोकांना ओळखून उघडे पाडले पाहिजे, भावनिक ब्लॅकमेल करणाऱ्यांना तोंडावर उत्तर दिले पाहिजे, खऱ्या समाजसेवकांना ओळखा आणि त्यांना पाठिंबा द्या, भ्रष्ट आणि फसव्या लोकांना वेळीच विरोध करण्याची जबाबदारी प्रत्येक जबाबदार, विचारी लोकांनी घेतली पाहिजे.

**महापुरुषांचे खरे अनुयायी कोण?**

महापुरुषांचा सन्मान करायचा असेल, तर त्यांच्या विचारांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. समाजाच्या हितासाठी काम करणाऱ्या व्यक्तींनी खऱ्या कार्यकर्त्यांना ओळखले पाहिजे आणि समाजाला खऱ्या आणि खोट्या समाज सुधारकांमधला फरक सांगितला पाहिजे.

जे लोक समाजासाठी वास्तवात झटतात. त्यांना कोणताही राजकीय, आर्थिक किंवा वैयक्तिक स्वार्थ नसतो. समाजाच्या भल्यासाठी काम करणारे लोक स्वतःचा स्वार्थ बाजूला ठेवून समाज हितासाठी लढा देतात. सामान्य जनतेचे खरे प्रश्न सोडवणारे बोलत बसत नाहीत, तर समाजाच्या समस्या करिता अविरत झटतात. हे खऱ्या अनुयायांचे लक्षण आहेत.

**महापुरुषांचा विचार सत्यात उतरवूया**

महापुरुषांचा आदर करायचा असेल, तर त्यांच्या तत्त्वांचा स्वीकार करावा लागेल. निव्वळ जयंत्या आणि पुण्यतिथ्या साजऱ्या करून काहीही साध्य होणार नाही. जे लोक समाजाची दिशाभूल करतात, त्यांना वेळीच धडा शिकवला पाहिजे. अन्यथा, आपणही त्या फसवणुकीचा एक भाग होऊ. त्यामुळे आता वेळ आहे जागरूक होण्याची, खऱ्या विचारांचा पुरस्कार करण्याची आणि संधीसाधू स्वार्थी लोकांना त्यांची जागा दाखवण्याची.

-------------------

राहुल श्रीराम भोयर
ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर.
९४२१८१५११४
rahulbhoyar766@gmail.com

■ ■ ■

## वाचक लिहितात

### गजवा-ए-हिंद आणि सनातन राष्ट्राची गरज!

जेव्हा जेव्हा भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्धजन्य परिस्थिती निर्माण होते, तेव्हा तेव्हा गजवा-ए-हिंदचा नारा ऐकू येतो. ह्यगजवा-ए-हिंदह्णचा अर्थ आहे, इस्लामचा विस्तार करण्यासाठी भारताला इस्लामिक राज्य बनवणे आणि हिंदूंचा नाश करणे.

इतिहासाकडे वळून पाहिल्यास, बाबरने श्रीराम मंदिर पाडल्याचा, महमूद गजनवीने सोमनाथ मंदिर उद्ध्वस्त केल्याचा आणि त्या काळात हिंदूंवर झालेले अत्याचार हे देखील गजवा-ए-हिंद चेच उदाहरण आहेत. पहलगाम येथे झालेला दहशतवादी हल्ला हा भारताला ह्यगजवा-ए-हिंदह्ण बनवण्याच्या दृष्टीने केलेला भ्याड प्रयत्न होता. त्याला उत्तर म्हणून सरकारने केलेला एअर स्ट्राइक ऑपरेशन सिंदूर ही प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाची बाब आहे.

एकीकडे भारतीय सेना बाहेरील शत्रूंवर मात करत आहे, मात्र दुसरीकडे देशाच्या आत असलेले शत्रू पुरो (अधो) गामी विचारसरणीचे तथाकथित धर्मनिरपेक्षतावादी त्यांचे काय? ज्यामुळे सामान्य जनतेची दिशाभूल होते. त्याचाच परिणाम म्हणजे देशद्रोही घटना घडतात. एकवेळी सैन्य सामर्थ्याच्या जोरावर पाकिस्तानला पराभूत करणे इतके कठीण नाही, जितके देशात सुरक्षित असलेले पुरो (अधो) गामी यांना वठणीवर आणणे कठीण आहे. एकंदरीतच डावी विचारसरणी, जिहादी आक्रमण यांचा नायनाट करण्यासाठी, सनातन राष्ट्राची स्थापना हा एकमेव मार्ग आहे.

■ सौ. प्रिया बागडदेव, छिंदवाडा.

### नेत्यांचे पुनर्वसन?

देशात सर्वसामान्य नागरिक आणि राजकीय पक्षांचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यासाठी वेगवेगळे नियम आहेत की काय? अशी शंका घेण्यास वाव आहे. लोकसभा, विधानसभेच्या निवडणुकीत पराभूत झाले तरी पाय चाटणाऱ्यांना राज्यसभा, विधानपरिषद, महामंडळ यामध्ये बॅकडोर संधी मिळते. म्हणजे पक्षाकडून अशांची सोय करून दिली जाते. परंतु, उच्च शिक्षणाच्या पदव्या घेवूनही लाखो तरूण नोकरीसाठी वणवण फिरत आहेत. परंतु, वर्षानुवर्षे भरतीच केली जात नाही. काही मोजक्या पदांची भरती प्रक्रिया सोडली तर बहुतेक संवर्गातील भरती बंद आहे. नैराश्याने ग्रासलेले तरूण आत्महत्या करीत आहेत आणि नेते, पुढारी मजा मारत आहेत. जय हो...

■ सुनिल तांबे, नागपूर.

# तुम्ही सुद्धा 'Sugarfree Diet' करताय?





आजकालच्या धावपळीच्या आयुष्यात अनेकवेळा आरोग्याकडे दुर्लक्ष होते. निरोगी आरोग्यासाठी तुमच्या आहाराकडे जास्त प्रमाणात जंक फूड खाल्ल्यामुळे आणि कोल्ड ड्रिंक्सचे सेवन केल्यामुळे शरीरावर गंभीर परिणाम दिसून येतात. जंक फूडमध्ये सॅच्युरेटेड फॅट्स असतात ज्याचे सेवन केल्यामुळे कोलेस्ट्रॉलची मात्रा वाढते व लठ्ठपणा, वजन वाढणे यासारख्या समस्या उद्भवतात. वाढलेल्या वजनामुळे उच्च रक्तदाब, मधुमेह आणि हृदयासंबंधित अनेक समस्या उद्भवतात.

अनेकजण वजन कमी करण्यासाठी डायटींग करतात आणि भरपूर व्यायाम करतात. परंतु वजन कमी करण्यासाठी तुमच्या आहारात पोषक तत्वांचा समावेश करणे गरजेचे असते. अनेकजण आहारामध्ये साखरेचा समावेश करत नाही तर वजन कमी करण्यासाठी साखर खाणे बंद करतात. परंतु आहारातून साखर काढून टाकली तर त्याचे काय परिणाम होतील?

साखरेला पांढरे विष मानले जाते त्याचे सेवन करणे बंद केल्यास, तुम्ही निरोगी व्हाल..ह्ण घरातील वडिलांपासून ते प्रत्येक फिटनेस तज्ञ, आहारतज्ज्ञ आणि सोशल मीडिया प्रभावकांपर्यंत सर्वजण आजकाल हे सांगत आहेत. जास्त साखर खाल्ल्याने लठ्ठपणा, मधुमेह, हृदयरोग आणि त्वचेच्या समस्या यासारख्या अनेक समस्या निर्माण होतात यात शंका नाही. परंतु साखर १००% सोडून देणे हा खरोखर योग्य निर्णय आहे का?

साखर शरीरासाठी जलद उर्जेचा स्रोत आहे. जेव्हा ते घेणे बंद करता तेव्हा तुम्हाला थकवा, अशक्तपणा किंवा एकाग्रतेचा अभाव जाणवू शकतो. साखर मेंदूमध्ये डोपामाइन सोडते, ज्यामुळे मूड चांगला राहतो, परंतु जेव्हा अचानक साखर बंद करता तेव्हा मूड स्विंग, राग आणि चिडचिड होऊ शकते . साखर खाल्लूयाने रक्तातील साखर अचानक वाढते आणि नंतर कमी होते, ज्यामुळे तुम्हाला वारंवार भूक लागते. पण जेव्हा तुम्ही साखर पूर्णपणे काढून टाकता तेव्हा सुरुवातीला साखरेची तीव्र इच्छा वाढू शकते. जास्त साखर यकृतावर भार वाढवते आणि फॅटी लिव्हर सारख्या समस्या निर्माण करू शकते.

काही लोक वजन कमी करण्यासाठी साखर सोडतात. यामुळे त्यांचे वजन कमी होते, परंतु उर्जेच्या कमतरतेमुळे त्यांना सुस्ती आणि थकवा जाणवतो. म्हणून, अचानक साखर सोडण्याऐवजी, ती हळूहळू कमी करा. फळे, मध किंवा गूळ यासारखी नैसर्गिक साखर मर्यादित प्रमाणात घ्या. प्रक्रिया केलेले साखर आणि गोड पॅक केलेले पदार्थांपासून दूर रहा. साखरेमुळे दाढ किडण्याची समस्या वाढते, जास्त साखर खाल्ल्याने कोलेस्ट्रॉलची पातळी वाढू शकते, ज्यामुळे हृदयविकार होण्याची शक्यता वाढते.

■ ■ ■

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### मानवता धर्म

जातपात धर्म देश
असो कोणताही
मानवता धमार्चे पालन
जगी सर्वश्रेष्ठ राही ङ्ग

अनितीने वागता पेटतो
दोन्ही पक्षात वणवा
बरबाद होती पिढ्या
महाभारत आहे पुरावा ङ्ग

अती लोभ क्रोध हा
सर्व पापांचा असे बाप
त्यावर नियंत्रण ठेवता
सुख शांती नांदे आपोआप ..!

# उद्योगांसाठी लवचिक उद्योग धोरण राबवू:उद्योग मंत्री सामंत

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती , दि. ९:

पीएम मित्रा टेक्स्टाइल पार्कमध्ये मोठ्या प्रमाणात तसेच जलदगतीने उद्योगांनी यावे, यासाठी पहिल्या वर्षी येणाऱ्या उद्योगांसाठी जमिनीचे दर हे १५८० वरून ६०० रु. चौ. मी.पर्यंत कमी केले आहेत. तसेच केंद्रीय एकिकृत पाणी प्रक्रिया केंद्रही (सीएटीपी) पाण्याचे दर वाढवणार नसून ते दर६७ रुपयांवर आणलेत. जास्तीच्या विद्यमान दरात आणखी ५० टक्के सूट दिली जाईल. राज्य शासनाने उद्योगांसाठी लवचिक धोरण राबवण्याचा निर्णय घेतल्याची माहिती राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवनात पत्रकारांशी संवाद साधताना दिली. पीएम मित्रा टेक्स्टाइल पार्क अमरावतीसाठी महत्त्वाकांक्षी उपक्रम असून येथे कापड निर्मितीशी संबंधित सर्वच उद्योगांनी यावे याकरिमता विविध सवलती शासनाकडून दिल्या जाणार आहेत. आयटी व मध्यम व लघु उद्योग पार्क उभारले जाणार आहेत. यासाठी एमआयडीसीतील



एकूण जमिनीच्या टक्के जमीन राखीव ठेवली. टेक्स्टाइल पार्कसाठी आतापर्यंत ५ कंपन्यांसोबत एकूण १३०० कोटी रुपयांचे एमओयू झाले असून सनातन, प्रतापसारख्या कंपन्या अमरावतीत येणार आहेत. टेक्स्टाइल पार्क पूर्ण झाला की, अमरावती जिल्ह्यातील १० ते १५ हजार लोकांना येथे रोजगार मिळेल, अशी आशाही उद्योग मंत्र्यांनी व्यक्त केली. काही कंपन्या या अमरावती एमआयडीसी इंडस्ट्रीतून जाण्याच्या मन:स्थितीत आहेत. त्यांचे काय करणार, असे विचारल्यानंतर उद्योगमंत्र्यांनी स्वत: तसेच मुख्यमंत्री या कंपन्यांसोबत लवकरच चर्चा करणार आहोत. त्यांना येथे येत असलेल्या अडचणी समजून घेत त्यातून मार्ग काढला जाईल, असेही उद्योगमंत्री सामंत म्हणाले. कोट्यवधींचा नफा होत असतानाही अचलपूर येथील फिनले मिल बंद का? याची नेमकी कारणे काय, यासंदर्भात माहिती घेतली जाईल. फिनले मिलबाबत आमच्याकडे अद्याप कोणतीही तक्रार आली नाही. येथील कामगारांवर सध्या उपासमारीची वेळ आल्याचे पत्रकारांकडूनच कळले आहे. या मिलला सुरू करण्यासाठी शासनाद्वारे प्रयत्न करता येऊ शकतात. मात्र, अनेकदा प्रदूषण विभाग किंवा उद्योजकांच्या धोरणामुळे उद्योग बंद पडतात, असेही सामंत म्हणाले. पीएम मित्रा टेक्स्टाइल पार्कमध्ये रेमंड्स या कापड व तयार पोशाख निर्मितीत अग्रणी कंपनीला शासनाने ८ वर्षात५०० एकर जागा दिली आहे. यापैकी केवळ ४० एकर जमिनीवर त्यांनी प्लांट उभा केला आहे. उर्वरित जागेचे तुम्ही काय करणार, असे त्यांना विचारल्यानंतर आम्ही आणखी १५०कोटी रु.चे युनिट उभारणार असल्याचे कंपनीने सांगितले आहे. तरीही त्यांच्याकडे जेवढी जागा शिल्लक राहिल ती भविष्यात परत घेतली जाऊ शकते. याबाबत आढावा बैठकीत रेमंड्स कंपनीच्या अधिकाऱ्यांना उद्योग मंत्र्यांनी विचारणा केली. उद्योगांशी करार केल्यानंतर ६८ टक्के उद्योग एमआयडीसीत सुरू झाले आहेत. तसेच ज्या कंपन्या मोठ्या प्रमाणात जागा बळकावून बसल्या तसेच त्या जागेचा कोणताही वापर केला जात नाही, अशा जागा परत घेतल्या जातील, असा इशाराही उद्योग मंत्र्यांनी दिला.

# कृषि विद्यापीठाची मॉडेल व्हिलेज योजना अधिक लोकाभिमुख व्हावी: कुलगुरू डॉ. शरद गडाख

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला , दि. ९ :

जागतिक हवामान बदलासह खुल्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेच्या पार्श्वभूमीवर देशांतर्गत शेती शाश्वत होण्यासोबत गाव-खेडेआर्थिक व सामाजिक दृष्टिकोनातून स्वयंपूर्ण - आत्मनिर्भर होणे अत्यावश्यक असून अकोला कृषि विद्यापीठाची मॉडेल व्हिलेज संकल्पना राज्याकरिता दिशादर्शक ठरेल, असा विश्वास डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी व्यक्त केला.

विद्यापीठाच्या विस्तार शिक्षण संचालनालयाद्वारे संचालित विदर्भस्तरीय मॉडेल व्हिलेज योजना, शेतकरी शास्त्रज्ञ मंच आणि कृषि निविष्ठा विक्री केंद्राच्या कृषि विद्यापीठाच्या अकोला मुख्यालयी आयोजित आढावा बैठकीचे अध्यक्षस्थानावरून उपस्थित कृषि विज्ञान केंद्र, कृषि संशोधन केंद्र, कृषि महाविद्यालयांचे प्रमुख, शास्त्रज्ञ, विषयतज्ञ, प्राध्यापक आदिंना मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. शरद गडाख बोलत होते.

सुजलाम सुफलाम महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीमध्ये गाव खेड्यांचा महत्त्वाचा वाटा असून



व्यावसायिक शेती व शेतीपूरक उद्योगधंद्यांची शहरापर्यंतचा जोड साखळी निर्माण केल्यास गावात निर्माण होणाऱ्या कच्च्या मालावर गावातच प्रक्रिया होत पक्का माल शहरातील ग्राहकांना उपलब्ध होईल व पर्यायाने रोजगार निर्मिती होत शहरांकडील स्थलांतर कमी होण्यास मदत होईल, असे व्यवहारिक प्रतिपादन देखील कुलगुरू डॉ. गडाख यांनी केले व मॉडेल व्हिलेज निर्मितीसाठी सर्व शासकीय, निमशासकीय, सहकारी, सेवाभावी, खाजगी विभागांनी एकत्रित येत एकात्मिक प्रयत्नांची मोट बांधणे गरजेचे असल्याचे सांगत विद्यापीठातील प्रत्येक कृषि विज्ञान केंद्र, कृषि संशोधन केंद्र, कृषि महाविद्यालयांनी तन-मन-धनाने प्रयत्नांची आवश्यकता व्यक्त केली.

आढावा सभेच्या प्रसंगी विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विलास खर्चे, विस्तार शिक्षण संचालक डॉ. धनराज उंदीरवाडे, अधिष्ठाता कृषी अभियांत्रिकी डॉ. सुरेंद्र काळबांडे आदींची विचार मंचावर उपस्थित होती तर सहयोगी अधिष्ठाता डॉ. शैलेश हरणे, डॉ. राजेंद्र काटकर, नियंत्रक प्रमोद पाटील, विस्तार शिक्षण विभागाचे प्रमुख डॉ. नितीन कोष्टी, यांचेसह कृषि विज्ञान केंद्र, कृषि संशोधन केंद्र, कृषि महाविद्यालयांचे प्रमुख, शास्त्रज्ञ, विषयतज्ञ, प्राध्यापक सर्व वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ, विभाग प्रमुख, अधिकारी- कर्मचारी, आदींची उपस्थिती होती.

प्रास्ताविकात बैठकीचे आयोजनाचा हेतू विषद करताना विस्तार शिक्षण संचालक डॉ. धनराज उंदीरवाडे यांनी सध्या जिल्हास्तरावर निवडलेले प्रत्येकी एक गाव मॉडेल व्हिलेज म्हणून लौकिकास पात्र करावे जेणेकरून भविष्यात तालुका पातळीवर प्रत्येकी एक गांव व पर्यायाने संपूर्ण विदर्भ शेती समृद्ध व आत्मनिर्भर करता येईल असा आशावाद व्यक्त केला तर विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विलास खर्चे यांनी विद्यापीठाद्वारे निर्मित पिकवाण, तंत्रज्ञान, शिफारसी, यंत्रे-अवजा आदी विदर्भातील शेतीला दिशादर्शक असून जिल्हानिहाय कृषी विभागाचे तथा इतर संस्थांचे सक्रिय सहभागातून कृषी विस्ताराचे कार्य पार पाडत शाश्वत शेती संपन्न शेतकरी संकल्पना कृतीत उतरवण्यासाठी सर्वच विभाग एकात्मिक प्रयत्नाची मोट बांधू असे आवाहन उपस्थितांना केले.

## गुणवंत विद्यार्थी सत्कार



आर्वी दि.९ प्रतिनिधी: केंद्र व राज्य सेवानिवृत्त कर्मचारी संघटना व जेष्ठ नागरिक संघाच्यावतीने तालुक्यातून १२ वी परिक्षेतील गुणवंत विद्यार्थी यांच्या गुणगौरव व सत्कार कार्यक्रम प्रेमराज जी पालीवाल यांच्या निवासस्थानी आयोजित करण्यात होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष डॉ वसंत गुल्हाने,ज्येष्ठ नागरिक संघाचे सचिव जगन्नाथ बेलवे, ॲड. विनोद देशपांडे,सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष भैय्या केंडे, जिल्हा उपाध्यक्षप्रेमराज पालीवाल, सूर्यकांत महाजन, अरविंद वावरे, अभय दर्भे, सतीशठाकरे आदी उपस्थित होते. उच्च माध्यमिक परीक्षेत विज्ञान शाखेत तालुक्यातून प्रथम आलेली मॉडेल कनिष्ठ महाविद्यालयाची विद्यार्थिनी वेदांती गजानन सुकलकर ४२.६७.टक्के प्राप्त करुन तालुक्यातून द्वितीय, कोमल गजानन हरेल ८४ टक्के मिळवून तालुक्यातून तृतीय, खुशी दिनेशसिंग सोळंकी ८८.८७.टक्के गुण मिळविले. या गुणवंतांचा मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमांमध्ये लितेश पालीवाल, पियुष पालीवाल, सिद्धी पालीवाल, राजवी पालीवाल या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार याप्रसंगी करण्यात आला. याप्रसंगी भय्या केंडे व डॉ वसंत गुल्हाने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा अभय दर्भे यांनी करुन आभार डॉ. सतीश ठाकरे यांनी मानले. कार्यक्रमाला डॉ प्रमोद जाणे, प्रदीप डोंगरे,प्रेम कुमार चोपडे, शालिनी वाळके, शोभा कदम, रमेश गहलोत, राजेश पांडे आदी सेवानिवृत्त कर्मचारी संघटना शाखा आर्वी व जेष्ठ नागरिक संघ आर्वी यांचे पदाधिकारी व सदस्य,पालक उपस्थित होते.

## प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण दोन अंतर्गत घरांचे नवीन सर्वेक्षण

**वर्धा, दि. ९प्रतिनिधी.** प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा क्रमांक दोन अंतर्गत कच्चे घर व बेघर असणाऱ्या कुटुंबांचे नवीन सर्वेक्षण सुरू रण्यात आले आहे. या सर्वेक्षणाचा उद्देश गरजू व पात्र कुटुंबांना योजनेंतर्गत घरे उपलब्ध करून देणे हा आहे. सदर सर्वेक्षण सर्व कुटुंबांचे सर्वेक्षण नसून फक्त बेघर, कच्च्या घरात राहणारे कुटुंब, प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत आवास प्लस सर्वेक्षण २०१८ मध्ये तयार करण्यात आलेल्या प्रतिक्षा यादी मध्ये समाविष्ट न झालेले परंतु सद्यस्थितीत पात्र असलेले कुटुंब, सर्वेक्षणामध्ये अपात्रेच्या निकषानुसार सिस्टीमद्वारे अपात्र झालेले परंतु सद्यस्थितीत पात्र असलेले कुटुंब, नवीन अपात्रेच्या निकषानुसार पात्र असलेल्या कुटुंबांचे सर्वेक्षण आहे. योजनेच्या सुधारीत अपात्रतेच्या निकषानुसार तीन, चारचाकी वाहन असणारे कुटूंब, तीन, चारचाकी कृषी उपकरण असणारे कुटूंब, ५० हजार किसान क्रेडीट कार्ड किंवा त्याहुन अधिक क्रेडीट मर्यादा असलेले कुटूंब, कुटुंबातील कोणताही सदस्य सरकारी कर्मचारी असलेले कुटूंब, शासनाकडे नोंदणीकृत बिगर कृषी उद्योग असलेली कुटुंबे, कुटुंबातील कोणताही सदस्य दरमहा १५ हजारापेक्षा जास्त कमवत असलेले कुटूंबे, आयकर भरणारे कुटुंबे, व्यवसायीक कर भरणारे कुटुंब, २.५. एकर किंवा त्याहून अधिक बागायती जमीन असणारे कुटूंब, ५ एकर पेक्षा जास्त परंतु जिरायती जमीन असणारे कुटूंब अपात्र आहेत. ज्या कुटुंबांकडे सद्या राहण्यासाठी पक्के घर नाही किंवा जे पूर्णपणे बेघर आहेत, अशा पात्र कुटुंबांनी आपले सर्वेक्षण करून घ्यावे. सद्या काही कुटुंबे नोकरी, व्यवसाय किंवा अन्य कारणास्तव परगावी वास्तव्यास असतील, त्यांनी योजनेचा लाभ मिळवण्यासाठी गावात येऊन सर्वेक्षण पूर्ण करावे. ग्रामपंचायत स्तरावर सरपंच, उपसरपंच व सदस्यांनी सर्वेक्षणाची माहिती जनतेपर्यंत पोहोचवून एकही पात्र कुटुंब योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, अतिरिक्त मुख्य मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक सुरज गोहाड यांनी केले आहे. सर्वेक्षण पुर्ण करण्याची अंतिम तारीख १५ मे असून हे सर्वेक्षण वेळेत व अचूकपणे होणे आवश्यक आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रे आपल्यासोबत ठेवावी. ज्या पात्र लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ घ्यावयाचा आहे, त्यांनी स्वत:चे आधार कार्ड अपडेट करणे आवश्यक आहे. कुटुंबामध्ये घरकुलाचा लाभ घेतला असल्यास नवीन जॉब पंचायत समितीमध्ये काढून घ्यावे, असे कळविण्यात आले आहे.

## मदनी येथे होणारा बाल विवाह रोखला

**वर्धा दि. ९ प्रतिनिधी.** ग्रामपंचायत मदनी येथे दिनांक ६ मे रोजी बाल विवाह होत असल्याची माहिती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयास प्राप्त झाली होती. कार्यालयाने संबंधित विविध विभागाच्या सहकार्याने होणारा हा विवाह रोखला. मदनी या गावातील ग्रामसेवक तथा बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी यांनी चौकस राहून तसेच महिला व बाल विकास विभागाच्या सतर्कतेने व पोलीस विभागाचे सहकार्य घेऊन बालविवाह थांबविण्यात मोलाची कामगिरी पार पाडली. सदर वेळी ग्रामसेवक करपाते यांनी मुलीचे आई वडील व मुलाचे आई वडील आणि इतर नातेवाईक यांना ग्रामपंचायत येथे बोलावुन मुलींचे वय १८ वर्ष पूर्ण झाल्याशिवाय विवाह करणार नाही, असा जबाबनामा लिहून घेतला तसेच समज दिली. यासोबतच मुलीचा विवाह १८वर्षाच्या आत करण्याचा प्रयत्न केला तर बाल विवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ नुसार कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, असे सांगितले.

# अमली पदार्थाची विक्री करणारे दोघे ताब्यात

### एकुण लाख ८हजार ३४०रू चा मुद्देमाल जप्त



**हिंगणघाट ,दि.९प्रतिनिधी.** मॅफेड्रान नावाचा अंमली पदार्थ विक्री करण्याकरिता आरोपी जाममार्गे हिंगणघाटकडे जात असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली.पोलिसांनी माहितीच्या आधारे सापळा रचुन नाकेबंदी केली असता मोटर सायकलवरुन संशयित जाताना दिसले त्यांना ताब्यात घेत प्लास्टीक पन्नीसह वजन . ६.५५ग्रॅम किंमत १८हजार ३४० रु विना क्रमांकाची दुचाकी किंमत ४०हजाररू. असा एकुण १लाख ८हजार ३४० रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.ही कारवाई गुन्हे प्रगटीकरण पथकानेकेली. सहायकपोलिसनिरीक्षक अनिल आळंदे व गुन्हे प्रगटीकरन पथकाचे अंमलदार पेट्रोलिंग करीत असतांना मुखबीरकडून निखिल अशोक भोकरे वय (२०) रा. संत चोखोबा वार्ड, हा मोटरसायकलने मॅफेड्रान नावाचा अंमली पदार्थ विक्री करण्याच्या उद्देशाने जामकडून हिंगणघाटकडे वाहतूक करीत आहे. माहितीच्या आधारावर निरीक्षक देवेंद्र ठाकूर यांच्या आदेशाने रिमडोह येथे नॅशनलहायवे क्रमांक ४४ येथील हनुमान मंदीराजवळ नाकेबंदी केली असता एका मोटर सायकलवर दोघे संशयित जामकडून सर्विस रोडने येताना दिसून आल्याने मोटरसायकल थाबवून इसमांस ताब्यात घेत विचारपूस केली असतात्याने त्याचेनाव, पत्ता, निखिल अशोक भोकरे वय (२०)व त्याच्या मागे बसलेल्या इसमाने आकाश उर्फ लल्ला धनराज शिंदे वय (३४ )वर्ष दोन्ही रा. संत चोखोबा वार्ड, हिंगणघाट .जि. वर्धा असे सांगीतले. पंचासमक्ष यांची अंगझडती घेतली असता त्याचे अंगझडतीमध्ये मोटर सायकल चालक निखिल भोकरे यच्या पॅन्टच्या खिशात १ एका प्लॅस्टीकच्या पन्नीमध्ये मॅफेड्रान नावाचा मनोव्यापारावर परिणाम करणारा पदार्थ भरून असल्याने त्यांचेकडून प्लास्टीक पन्नीसह वजन६.५५ . ग्रॅम किंमत १८हजार३४०रुविनाक्रमांकाचीदुचाकी किंमत ४०हजार रू. असा एकुण लाख ८हजार ३४० रूचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

एनडीपीएस कायद्यान्वये दोन्ही आरोपींवर गुन्हा नोंद करण्यात आला.ही कारवाई पोलिस अधीक्षक अनुराग जैन, अप्पर पोलीस अधीक्षक डॉं. सागर कवडे उपविभागीय पोलीस अधिकारी रोशन पंडीत निर्देशानुसार देवेंद्र ठाकूर पोलीस निरीक्षक यांचे आदेशाने सहायकपोलिस निरीखक अनिल आळंदे यांचे प्रत्यक्ष मार्गदर्शनात डि.बी. पथकाचे प्रशांत ठोंबरे, राहुल साठे, आशिष नेवारे, मंगेश वाघमारे सायबर शाखा वर्धा येथील अनुप कावळे,गोविंद मुंडे यांनी केली. पुढील तपास हिंगणघाट पोलीस करत आहे.

# बालमनातील संकल्पना उमटल्या नाट्य रंगमंचावर

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला , दि. ९ :

सुट्ट्या लागल्या की लहान मुलांना अनेक गोष्टींचे वेध लागतात. लहान मुले सतत कोणाला कोणाची नक्कल करत त्यांच्या कल्पना विश्वात वावरत असतात पण जसजशी ती मोठी होतात, ह्या सर्व गोष्टी त्यांच्या मनातच दडून राहतात. परंतु, ह्या सर्व बाबी मनातच न राहता कुठेतरी व्यक्त होण्यासाठी त्यांना गरज आहे. अशा एखाद्या जागेची तिथे त्यांना मनसोक्त खेळता येईल, बागडता येईल आणि त्यांच्या मनातील संकल्पना पुढे मांडता येतील म्हणूनच आरडीजी कॉलेज आणि सिद्धी गणेश प्रॉडक्शन यांच्या संयुक्त विद्यमाने ४ दिवसीय नाट्य प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. रंगभूमीचे जतन व संवर्धन करून नवीन कलाकार तयार व्हावेत या हेतूने भारतीय सेवा सदनचे संचालक दिलीपराज गोयनका यांच्या संकल्पनेतून आणि आरडीजी महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. चारुशीला रुमाले यांच्या मार्गदर्शनात शिबिर समन्वयक सचिन गिरी यांच्या नियोजनाखाली या बालनाट्य प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. नाट्य प्रशिक्षण शिबिराच्या माध्यमातून नवोदित कलाकारांना नाटकाच्या तंत्राचा अभ्यास व्हावा, योग्य मार्गदर्शन मिळावे, त्यांच्या कलागुणांचा विकास व्हावा व त्यांना योग्य व्यासपीठ मिळावे यासाठी हे नाट्य प्रशिक्षण



शिबिरात वय वर्षे ७ ते १४ या वयोगटातील शालेय विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणात कुठलेही मूल्य आकारले नव्हते प्रवेश विनामूल्य प्रवेश देण्यात आला होता. शिबिराचे उद्घाटन थाटात संपन्न झाले. बालनाट्य प्रशिक्षणात मार्गदर्शक म्हणून नाट्य क्षेत्रातील बालनाट्यासाठी महाराष्ट्रभर प्रसिद्ध देवदत्त पाठक आणि त्यांचे सहकारी मिलिंद केळकर, अकोल्यात बालनाट्य शिबिरासाठी सर्वांना माहिती असलेले डॉ. सुनील गजरे, ज्येष्ठ नाट्यकर्मी विष्णू निंबाळकर आणि बरेच ज्येष्ठ नाट्य कलावंत, तंत्रज्ञ, लेखक हे मार्गदर्शक म्हणून होते. प्रशिक्षण संपल्यानंतर सहभागींना प्रमाणपत्र देण्यात आले. समारोप कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून भारतीय सेवा सदनचे अध्यक्ष दिलीपराज गोयनका, डॉ. सुनील गजरे, विष्णू निंबाळकर, व प्राचार्य डॉ. चारुशीला रुमाले उपस्थित होते. शिबिर संचालक सचिन गिरी, गीता जोशी, विष्णू शिरसागर, महेश इंगळे, रोशन समदुरे, प्रमोद वानखडे, स्वराज पातोळे, अक्षय पिंपळकर, यांनी शिबिराच्या यशस्वितेसाठी प्रयत्न केलेत. देवदत्त पाठक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व प्रशिक्षण दिले. फिटर गेमच्या माध्यमातून नवरस प्रशिक्षण रंगतदार ठरले. नुसते शाळेत अभ्यास करून मुलांचा सर्वांगीण विकास होणे शक्य नाही. त्याकरिता बालनाट्य प्रशिक्षण शिबिरांची अत्यंत गरज आहे, असे मत देवदत्त पाठक यांनी मांडले. भविष्यातील पिढी घडवण्यासाठी बालनाट्य प्रशिक्षणाच्या माध्यमातून देण्यात येणारे संस्कार अत्यंत महत्त्वाचे आहेत, असेही ते म्हणाले. देवदत्त पाठक यांनी तीन हजाराच्यावर बालनाट्य शिबिरे घेतली आहेत. बाराशेच्यावर थेटर गेम्सची निर्मिती केली आहे. झोपडपट्ट्यांमध्ये जाऊन तेथील मुलांना मोफत नाट्य प्रशिक्षण शिबिर ते देत असतात. शिबिराच्या समारोप कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी अनेक नाट्यछटा आणि स्किट सादर केल्या. गणपती बाप्पा मोरया, सुंदर गाव, स्वच्छ गाव, आदर्श वाढदिवस, स्त्री शक्ती, गणेश विसर्जन, लग्न पहावे करून, मला अभ्यास करू द्या, गुरु-शिष्य परंपरा, वो बुलाती है मगर जाने का नही..., पुतळा अशी सादरीकरण करण्यात आली.

# फुले सिनेमा टॅक्स फ्री करा

**वर्धा,दि.९प्रतिनिधी.** भारतातील सामाजिक क्रांतीचे अग्रदूत महात्मा ज्योतिराव फुले व पहिल्या स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित हिंदीतील चित्रपट फुलें २५ एप्रिल२०२५ला प्रदर्शित झाला. परंतु अजूनही महाराष्ट्र शासनाने राज्याच्या स्तरावर या सामाजिक क्रांतीच्या ऐतिहासिक सिनेमाला टॅक्स प्री केलेले नाही. महात्मा ज्योतिराव फुले हे असे व्यक्तिमत्व होते ज्यांनी विचारांची भूमिका मांडण्यासोबतच प्रत्यक्ष कृतीचा आधार जीवनात दिला.महाराष्ट्र शासनाने अजूनही या सिनेमाला टॅक्स प्री का केले नाही हा प्रश्न आहे ? तरी सरकारने लवकरात लवकर हा सिनेमा टॅक्स प्री करावा अशी मागणी किसान अधिकार अभियानच्यावतीने निवेदनाव्दारे केली आहे. महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे योगदान राष्ट्रीय स्तरावरचे आहे. त्यांचे प्रत्यक्ष काम महाराष्ट्र मध्ये झाले असूनमहाराष्ट्रातील प्रत्येक सामान्य बहुजन समाजातील नागरिकांना



ज्योतिराव फुले व सावित्रीबाई फुले यांचा संघर्ष व त्यांचे क्रांतिकार्य जसे की शिक्षणातील शेती शेतकरीच्या संबंधातील, रुढी परंपरांबाबतीत, अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य, विधवा व एकल महिलांच्या संदर्भातले कार्य, निराश्रीतांच्या संदर्भातले कार्य समाजाच्या समोर येणे गरजेचे आहे. तत्कालीन ब्राह्मण्यवादी , जातीवादी, मांध व क्रूर लोकांच्या सोबत आणि व्यवस्थेत त्यांना संघर्ष करावा लागला.

विविध यातना सहन करावा लागल्या. त्यातूनही त्यांनी हार न मानता नवीन क्रांतीची चळवळ उभी केली.जी चळवळ अजूनही भारतातील सामान्य बहुजन समाजाच्या नागरिकाला दीपस्तंभ म्हणून उभी आहे. ही चळवळ समाजाच्या शेवटच्या माणसापर्यंत जाण्यासाठी सिनेमा आहे एक उत्तम माध्यम आहे. म्हणून त्यांच्यावर आधारित हिंदीतील सिनेमा भारतातील नागरिकांना ज्योतिरावांचे कार्य व विचार माहिती होण्यासोबतच प्रत्येक गावागावातील व्यक्तीपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे.

महाराष्ट्र शासनाने अजूनही या सिनेमाला टॅक्स प्री का केले नाही हा प्रश्न आहे.तरीही सरकारने लवकरात लवकर हा सिनेमा टॅक्स प्री करावा अशी मागणी किसान अधिकार अभियानच्यावतीने निवेदन देऊन करण्यात आली. यावेळी किसान अधिकार अभियानचे मुख्य प्रेरक अविनाश काकडे, जिल्हाध्यक्ष सुदाम पवार, गोपाल दुधाने, प्रफुल कुकडे, विठ्ठल झाडे ,प्रा प्रवीण भोयर, अमोल ठाकरे, चंद्रकांत ढगे, इरफान अली, मंगेश शेंडे, चंदू दुर्गे, अभिजीत नाखले, योगीराज बुरांडे, राहुल पोकळे, दिलीप पुनसे, मंगेश भुसे, अंकुश वैद्य, गौतम वासे, संजय बकाले आदींची उपस्थिती होती.

# परिमंडळाच्या सिकॅरिअस'ने जिंकली प्रेक्षकांची मने

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला , दि. ९ :

चंद्रपूर येथे दोन दिवस रंगलेल्या महावितरणच्या नागपूर प्रादेशिक आंतरपरिमंडलीय नाट्यस्पर्धेत चंद्रपूर परिमंडलाच्या रंग बावरी' या नाटकाने उत्कृष्ट अभिनयासह सर्वोत्कृष्ट नाटकाचा मान पटकावला. तर अकोला परिमंडळाचे सिकॅरिअस यांनी प्रेक्षकांची मने जिंकत उपविजेतेपद पटकावले आहे. या स्पर्धेतील विजेत्या कलाकारांना महावितरणचे संचालक अरविंद भादिकर आणि संचालक प्रसाद रेशमे यांच्या हस्ते गौरवण्यात आले. नागपूर परिक्षेत्राचे प्रादेशिक संचालक परेश भागवत,



महावितरणमधील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन कामातील या अनमोल अनुभवांना नाट्यकृतींच्या माध्यमातून समाजासमोर आणावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. महावितरण एक मोठा परिवार आहे आणि या कुटुंबातील सदस्यांमध्ये अनेक उत्कृष्ट कलागुण दडलेले आहेत. दैनंदिन कामाचा अभियंता दिलीप दोडके निर्मित, प्रदीप फाटक लिखित आणि हेमराज ढोके दिग्दर्शित ये रे घना' आणि गोंदिया परिमंडलाचे मुख्य अभियंता सुहास रंगारी निर्मित, अतुल साळवे लिखित व राजेंद्र गिरी दिग्दर्शित दि नॉनिमस' या नाटकांनाही रसिकांचा चांगला प्रतिसाद लाभला.


## ग्रामीण पाणी पुरवठा विभाग
## जिल्हा परिषद, नागपुर
## स्वच्छ भारत मिशन टप्पा - २
२०२४-२५

**ई निविदा सुचना क्र. २४ (प्रथम वेळ)**

स्वच्छ भारत मिशन टप्पा २ अंतर्गत घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन साठी खालील प्रमाणे एकुण ०१ कामांची ई-निविदा ग्रापापुवि, जि.प. नागपुर कडुन प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर ई-निविदा www.mahatenders.gov.in या वेब साईट वर उपलब्ध आहे.

१ मौजा तारसा ग्रा.प. तारसा ता. मौदा

दिनांक :-

कार्यकारी अभियंता
ग्रापापुवि, जि.प.नागपुर


RNINo-20789/71 महासागर नागपूर
मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३



# बालांगण

## असे असतात मॉल रोड

**जाणून घ्या**

छोट्या मित्रांनो; तुम्ही शिमला, मसूरी, मनाली किंवा नैनिताल यासारख्या हिल स्टेशनवर गेला असाल तर त्या त्या ठिकाणचा प्रसिद्ध मॉल रोड पाहिलाच असेल. हे रस्ते फक्त बाजारपेठाच नसतात तर प्रत्येक पर्यटकाला अनुभव घ्यावासा वाटणारा भाग असतो. त्यामुळेच लोक तिथे गर्दी करतात. पण तुम्ही कधी विचार केला आहे का की, या रस्त्यांना 'मॉल रोड' का म्हणतात आणि ही परंपरा कुठून सुरू झाली? चला, आज जाणून घेऊ या.



मुलांनो, पूर्वी 'मॉल' या शब्दाचा अर्थ वेगळा होता. ब्रिटीश राजवटीत मॉल हा शब्द खुल्या आणि रुंद मार्गासाठी वापरला जात असे. हा मार्ग विशेषतः चालण्यासाठी आणि सामाजिक मेळाव्यासाठी बांधला जायचा. १८ व्या आणि १९ व्या शतकात भारत ब्रिटीशांच्या अधिपत्याखाली असताना ब्रिटीश अधिकारी आणि त्यांचे कुटुंब उन्हाळ्याच्या हंगामात डोंगरावर जात असत. दिल्ली आणि कोलकात्याच्या कडक उन्हापासून वाचण्यासाठी ते शिमला, मसूरी आणि दार्जिलिंग सारख्या हिल स्टेशनवर जात असत. मग तिथे एक मुख्य रस्ता बांधला जायचा ज्यावरुन लोक संध्याकाळी फिरायचे, गप्पा मारायचे आणि सामाजिक जीवनाचा आनंद घ्यायचे. नंतर हेच रस्ते 'मॉल रोड' म्हणून ओळखले जाऊ लागले.

कालांतराने हे मॉल रोड केवळ ब्रिटिश अधिकाऱ्यांसाठी राहिले नाहीत तर स्वातंत्र्यानंतर ते सामान्य स्थानिक आणि पर्यटक अशा दोघांनाही आकर्षित करू लागले. स्थानिक हस्तकला, खाद्यपदार्थ, कपडे आणि सजावटीच्या वस्तू येथे मिळू लागल्या. हळूहळू हे मॉल रोड प्रत्येक डोंगराळ शहराची ओळख बनले.

तर मित्रांनो, अशाप्रकारे भारतात काही प्रमुख मॉल रोड आहेत. त्यामध्ये मसूरी मॉल रोड (उत्तराखंड) चा समावेश होतो. डोंगरांची राणी म्हणून ओळखला जाणारा मसूरीचा मॉल रोड संध्याकाळचा चहा घेण्यासाठी आणि सुंदर दृश्यांसाठी ओळखला जातो. शिमला मॉल रोड (हिमाचल प्रदेश) ब्रिटिश काळातील इमारती, जुन्या चर्च आणि सुंदर दुकानांनी सजलेला असून तो अजूनही इतिहास जपून ठेवतो आहे. त्याचप्रमाणे नैनीताल मॉल रोड (उत्तराखंड) नैनी तलावाच्या काठावर असून तो साहसी खेळ, खरेदी आणि स्वादिष्ट स्ट्रीट फूडसाठी प्रसिद्ध आहे. दार्जिलिंग मॉल रोड (पश्चिम बंगाल) चहाच्या बागांचा सुगंध, शांत वातावरण आणि दूरवर दिसणाऱ्या पर्वतांसाठी ओळखला जातो. दार्जिलिंगचा मॉल रोड प्रत्येक पर्यटकाचे मन जिंकतो.



**टेक्नो टॉक**

## असे वाढवा बॅटरी लाइफ

आजकाल सगळ्या स्मार्टफोनमध्ये शक्तिशाली प्रोसेसर आणि हाय-रेझोल्यूशन डिस्प्ले यासारखी प्रगत वैशिष्ट्ये असतात. यामुळे मोठी सोय होत असली तरी फोनची बॅटरी लवकर संपते. तथापि, काही गोष्टींची काळजी घेतल्यास डिव्हाइसचे बॅटरी लाइफ वाढवता येते. तेव्हा तुम्हीही या टिप्स अवश्य लक्षात ठेवा.

**ब्राइटनेस कमी करा**

मोबाईलची बॅटरी लाइफ वाढवण्यासाठी ब्राइटनेस कमी ठेवा. यामुळे बॅटरीचा वापर कमी होतो. यासाठी तुम्ही ॲडॉप्टिव्ह ब्राइटनेस फीचर देखील वापरू शकता. ते चालू केल्यास स्मार्टफोन बाह्य प्रकाशानुसार स्क्रीनचा ब्राइटनेस स्वयंचलितपणे सेट करेल. याचा फायदा म्हणजे तुम्हाला पुन्हा पुन्हा ब्राइटनेस नियंत्रित करावा लागणार नाही.

**कीबोर्डचे व्हायब्रेशन बंद करा**

आपण फोनमध्ये हॅप्टिक फीडबॅक (स्पर्श करताना व्हायब्रेशन) वापरतो. परंतु यामुळे जास्त बॅटरी खर्च होते. अशा परिस्थितीत फोनचे हे फीचर बंद करा. असे केल्याने बॅटरीचा वापर कमी होईल आणि बॅटरी लाइफ वाढेल.

**बॅकग्राउंड मोबाईल ॲप्स बंद करा**


बऱ्याचदा स्मार्टफोनमध्ये ॲप्स वापरतो आणि बंद करण्याचे विसरतो. पण यामुळे, ॲप फोनच्या बॅकग्राउंडमध्ये चालू राहतो. अशाने बॅटरीचा वापर वाढतो. म्हणूनच डिव्हाइसमध्ये ॲपचा वापर झाल्यानंतर ते बंद करा आणि बॅकग्राउंडमधूनही काढून टाका. यामुळे मोबाईलची बॅटरी लाइफ वाढेल.

**स्क्रीन टाइमआउट कमी करा**

बहुतेकजण स्क्रीन टाइमआउट एक किंवा दोन मिनिटांवर सेट ठेवतात. पण यामुळे बॅटरी लवकर संपते. अशा परिस्थितीत स्क्रीन टाइम आउट ३० सेकंदांवर सेट करा. यामुळे बॅटरी पॉवर वाढेल.

**जीपीएस बंद करा**

जीपीएस स्मार्टफोनची बॅटरी सर्वात जास्त वापरतो. तो सुरू ठेवल्याने बॅटरीचा वापर वाढतो. म्हणूनच वापरात नसतो तेव्हा जीपीएस बंद ठेवा. यामुळे बॅटरी पॉवर वेगाने वाढेल. याशिवाय फोनमध्ये वाय-फाय आणि ब्लूटूथही बंद ठेवा. यामुळेही बॅटरी लाइफ वाढण्यास मदत होईल.



## कचऱ्याचं काय होतं?

**नॉलेज**

छोट्यांनो, तुम्ही कचरा व्यवस्थापनाबद्दल ऐकलं असेल. तुमच्या सोसायटीतही ओला आणि सुका कचरा वेगळा करायला सांगितलं असेल. अशाप्रकारे कचरा वेगळ्या केल्यामुळे ओल्या कचऱ्यापासून खतनिर्मिती करणं सोपं जातं तर प्लास्टिक, कागद यासारख्या कोरड्या कचऱ्याचा पुनर्वापर करता येतो. आता तुमच्या घरातल्या या कचऱ्याचं नेमकं काय होतं हे जाणून घेऊ.

घराघरातून गोळा केलेल्या कचऱ्यापैकी ३२.२ टक्के कचऱ्याचा पुनर्वापर म्हणजेच रिसायकलिंग केलं जातं किंवा ओल्या कचऱ्यापासून खत तयार केलं जातं. १२.५ टक्के कचरा जाळला जातो तर जवळपास ५५ टक्के कचरा पुरला जातो. आता अशा प्रकारे कचरा पुरल्यामुळे पर्यावरणाचं खूप नुकसान होतं. महत्त्वाची बाब म्हणजे १९६० नंतर कचरा पुरण्याचं प्रमाण दुपटीने वाढलं आहे. कचरा पुरण्यामध्ये इंग्लंचा पहिला क्रमांक लागतो. रिसायकल करता न येणारा करचा पुरण्याचा निर्णय घेतला जातो. मात्र आता बऱ्याच ठिकाणी नव्या तंत्राज्ञानाचा वापर केला जात असल्यामुळे पर्यावरणाची हानी होणार नाही, याची काळजी घेतली जाते. योग्य व्यवस्थापन केल्यामुळे कचऱ्याचा चांगल्या प्रकारे उपयोग करता येतो. अनेक ठिकाणी नव्या पद्धतीचा अवलंब केला जात आहे. आपणही घरातला कचरा कमी करण्यासाठी प्रयत्न करू शकतो. तुमच्या घरात बाग असेल तर ओल्या कचऱ्यापासून घरच्या घरी नैसर्गिक खत तयार करता येईल. प्लास्टिक किंवा इतर वस्तूंचा पुनर्वापर करता येईल.



## असा असतो कोब्राचा फणा

**विचार करा**

छोट्या दोस्तांनो, तुम्हाला सापांच्या विश्वाविषयी कुतूहल वाटत असेल ना? हे स्वाभाविक आहे कारण त्यांचे जग खरोखर अनेक रहस्यांनी भरलेले आहे. कुतूहलाचा असाच एक भाग म्हणजे किंग कोब्राचा फणा. फण्याचा आकार आणि उसळून वार करण्याच्या शैलीसाठी कोब्रा जातीच्या नाग वेगळा दिसतो. तेव्हा हा फणा कसे काम करतो आणि तो इतर सापांपेक्षा कसा वेगळा आहे? हे आज जाणून घेऊ या.

मित्रांनो, कोब्राचा फणा ही एक विशेष प्रकारची शारीरिक रचना असून नागाच्या मानेभोवती असलेल्या स्नायू आणि कशेरुकांद्वारे ती नियंत्रित केली जाते. कोब्राला धोका जाणवताच मान वाढवतो आणि त्याचाच फणा तयार होतो. या प्रक्रियेत सापाच्या कशेरुकांदरम्यान असणारी हाडे आणि स्नायू एकत्र काम करत एक सपाट, पसरलेला पृष्ठभाग तयार करतात.

हा फणा कोब्राच्या शरीराच्या इतर भागांपेक्षा पूर्णपणे वेगळा दिसतो. नाग फणा पसरवताच तेव्हा केवळ त्याचा आकारच वाढवत नाहीत तर समोरच्या प्राण्याला किंवा भक्ष्याला घाबरवण्यासाठी एक भयानक प्रतिमा देखील तयार करतात. म्हणजेच संरक्षणात हा फणा महत्त्वाची भूमिका बजावतो. एखादा शिकारी किंवा शिकार नागाजवळ येतो तेव्हा नाग फणा काढून इशारा देतो. आपण त्याच्यासाठी धोकादायक ठरु शकत असल्याचेच जणू तो सांगत असतो. नागाच्या फण्याचा आकार तो हल्ला करण्यास तयार असल्याचेही सूचित करतो. त्यामुळेच अनेक प्राणी आणि माणूसदेखील नागाला पाहून घाबरतात आणि त्याच्यापासून दूर जाण्याचा प्रयत्न करतात.

इतर सापांच्या तुलनेत नागांकडे पाहिले तर आढळेल की त्यांचा आकार सर्वात वेगळा आहे. सामान्य सापांच्या शरीरात मान नसते तसेच त्यांचा शरीराचा आकार खूप लवचिक आणि साधा असतो. दुसरीकडे कोब्राच्या शरीरात एक कठीण आणि मजबूत भाग असतो जो त्यांना फणा तयार करण्यास मदत करतो. याशिवाय इतर साप वेग, विष किंवा आकाराद्वारे आपली ओळख तसेच धोका दर्शवून देतात परंतु कोब्रा आधीच फण्याद्वारे हा संदेश देतात. फण्यामुळे कोब्राची प्रतिमा अधिक भीतीदायक होते. खेरीज फणा मादी कोब्रासाठी आकर्षणाचे कारणही असतो. नर कोब्रा फणा पसरवतो तेव्हा त्याची शक्ती आणि आकारही प्रदर्शित करतो. त्यामुळे मादी कोब्रा त्याच्याकडे आकर्षित होऊ शकतात.

## घरीच करा सरबत

**झटपट रेसिपी**

उन्हाळ्यात थंड आणि ताजेतवाने होण्यासाठी सतत काहीतरी प्यावेसे वाटते ना... पण बाजारात मिळणाऱ्या कोल्ड्रिंक्समध्ये भरपूर साखर आणि अनेक हानिकारक घटक असतात. ते आरोग्यासाठी चांगले नसतात. अशावेळी तुम्ही घरीच एक खास शरबत बनवू शकता. ते केवळ चविष्टच नाही तर आरोग्यासाठीही फायदेशीर आहे. चला तर मग, ते कसे करायचे ते जाणून घेऊ या.



मित्रांनो, बडीशेपमध्ये अनेक औषधी गुणधर्म असतात हे तुम्ही जाणता. बडीशेप पचनक्रिया निरोगी ठेवते, पोटातील उष्णता कमी करते आणि शरीर थंड ठेवते. तेव्हा अशा या बडीशेपच्या सरबताने तुमची तहान भागतेच त्याचबरोबर उन्हापासून आरामही मिळतो. हे सरबत करण्यासाठी दोन टेबलस्पून बडीशेप, एक कप साखर, चार कप पाणी आणि थोडासा लिंबाचा रस तसेच बर्फाचे तुकडे हे साहित्य घ्या.

सर्वप्रथम पाणी आणि बडीशेप एका भांड्यात रात्रभर किंवा किमान चार-पास तास भिजत ठेवा. आता भिजलेल्या बडीशेपचा सर्व अर्क पाण्यात येईल. नंतर भिजवलेली बडीशेप मिक्सर किंवा ब्लेंडरमध्ये बारीक करुन घ्या. थोडे पाणी घालून मिश्रण चांगले बारीक करा. आता स्वच्छ कापड किंवा चाळणी घ्या आणि बडीशेपचे मिश्रण गाळून घ्या. यानंतर, बडीशेपचा जाड रस बाहेर येईल आणि साले वेगळी होतील. आता एका भांड्यात बडीशेपचा रस, साखर घाला आणि चांगले मिसळून गॅसवर ठेवा. साखर विरघळली की गॅस बंद करा आणि शरबत थंड होऊ द्या. थंड झाल्यावर त्यात थोडा लिंबाचा रस घाला. यामुळे शरबत चवदार होईल. हे स्वादिष्ट बडीशेप सरबत बर्फाचे तुकडे घालून पिता येईल.

## ओळखा पाहू

**जिज्ञासा**

१) रक्ताभिसरण क्रियेचा शोध कोणी लावला?
२) राष्ट्रीय हक्क दिवस कधी असतो?
३) विजेचा सर्वात उत्तम वाहक कोण?
४) मौर्य काळातली प्रसिद्ध शैक्षणिक संस्था कोणती?
५) एनइएफटीचं पूर्णरूप काय?
६) सर्वात थंड ग्रह कोणता?
७) सर्वात छोटा खंड कोणता?
८) सर्वात मोठ्या पर्वतरांगा कोणत्या?
९) जगातला सर्वात उंच धबधबा कोणता?
१०) जगातलं सर्वात उंच धरण कोणतं?

उत्तर : १) विल्यम हार्वे २) १० डिसेंबर ३) चांदी ४) तक्षशिला ५) नॅशनल इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर ६) नेपच्यून ७) ऑस्ट्रेलिया ८) हिमालय ९) एंजल(व्हेनेझुएला) १०) जिनपिंग १ (चीन)

**चित्र रंगवा**






## अंगभूत कौशल्ये वाढवा

**स्वयंविकास**

मित्रांनो, तुम्ही भरपूर अभ्यास करता. चांगले गुण मिळवता. पण फक्त पुस्तकी किडा असून भागत नाही. आपलं व्यक्तिमत्त्वही उठून दिसायला हवं. आपल्या अंगी काही कौशल्यं असायला हवीत किंवा अंगची कौशल्यं विकसित करायला हवीत. तुमच्या अंगी धीटपणा असायला हवा. यासाठी शाळेत तसंच सोसायटीत आयोजित होणाऱ्या स्पर्धांमध्ये सहभागी व्हा. वर्क्तृत्त्व, गायन, नृत्य, चर्चासत्र, विविध गुणदर्शनसारख्या स्पर्धांचं आयोजन केलेलं असतं. या स्पर्धांमध्ये तुम्ही सहभागी होऊ शकता. आंतरशालेय स्पर्धांचीही धूम असते. या स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी विशेष तयारी करावी लागते. या स्पर्धांच्या निमित्ताने तुम्ही इतर शाळेतल्या मुलांना भेटू शकता. तुमच्या मित्र-मैत्रिणींची संख्या वाढू शकते.

आंतरशालेय वक्तृत्त्व, गायन, नृत्य, वादविवाद, बुद्धीबळ अशाही स्पर्धा घेतल्या जातात. निबंध स्पर्धांचंही आयोजन केलं जातं. यातून तुम्ही तुमचे विचार मांडू शकता. वादविवाद स्पर्धेत भाग घेतल्याने भांडण न करता स्वत:चा मुद्दा पटवून देण्याचं कौशल्य तुम्ही अंगी बाणवू शकता. वक्तृत्त्व स्पर्धेत भाग घेऊन तुम्ही स्टेजची भीती घालवू शकता. एखाद्या खेळात प्रवीण असाल तर शाळेच्या संघात सहभागी होऊ शकता. बॅडमिंटन, टेनिससारख्या खेळांच्या स्पर्धांमध्ये सहभागी होऊ शकता. खो-खो, कबड्डीसारख्या खेळांसाठी शाळांचे संघ निवडले जातात. या संघांसाठीच्या निवड चाचणीत तुम्ही सहभागी होऊ शकता. अंगात चपळता असेल तर तुमची निवड होऊ शकेल. चित्रकला, हस्तकला येत असेल तर शालेय तसंच राष्ट्रीय स्तरावरच्या स्पर्धांमध्ये सहभागी होता येईल. शाळेतर्फे एखादं मासिक निघत असेल तर त्यात तुम्ही लिखाण करू शकता.

**ठिपके जुळवा**



**दोस्त हे मस्त**

### असा आहे टकिन



मित्रांनो, भूतान हा आपला शेजारी देश. या देशाबद्दल आपल्याला थोडीफार माहिती असायला हवी. म्हणूनच आपण या सुंदर देशातल्या एका मुक्या दोस्ताबद्दल जाणून घेऊ. या दोस्ताचं नाव आहे टकिन. टकिन हा भूतानचा राष्ट्रीय प्राणी. टकिन हा बकऱ्यांच्या प्रजातीचा प्राणी आहे. हे प्राणी साधारण २० जणांच्या कळपात राहतात. उन्हाळ्यात ३०० जणांचा कपळही तयार होतो. टकिन डोंगराळ तसंच गवताळ भागात आढळतो. अरूणाचल प्रदेश तसंच चीनमध्येही टकिन आढळतो.

**खादाडी**

### टेस्टी नूडल्स विथ चीझ

छोट्यांनो, नूडल्स तुम्हाला आवडतातच. पण एकाच प्रकारचे नूडल्स खाऊन कंटाळा आला असेल तर तुम्ही त्याला ट्विस्ट देऊ शकता. नूडल्स विथ चीझ ही रेसिपी तुम्हाला ट्राय करता येईल.



यासाठी एक कप नूडल्स, एक कप दूध, मीठ, अर्धा चमचा मिरपूड आणि चीझ असे पदार्थ घ्या. नूडल्स शिजवून घ्या. एका कढईत दूध गरम करा. मग त्यात चीझ घाला.नूडल्स घालून दूध आटवून घ्या. मग मीठ आणि मिरपूड घालून खा.

**टेक ग्यान**

### ही पद्धत धोक्याची...

बरेच जण लॅपटॉपवर काम करता करता मोबाईल चार्ज करतात. यासाठी चार्जरची वायर लॅपटॉपला जोडली जाते.



पण यामुळे मोबाईलमधली माहिती हॅक होण्याची शक्यता असते. त्यामुळे अशा प्रकारे मोबाईल चार्ज करण्याआधी थोडा विचार करा. शक्यतो लॅपटॉपला वायर जोडून मोबाईल चार्ज करूच नका.

**समाजभान**

### उत्सव असावे इको फ्रेंडली

दोस्तांनो, सण-उत्सवांचा आनंद लुटताना पर्यावरणाचं भान राखणंही गरजेचं असतं. अगदी छोट्या छोट्या बदलांनी आपण पर्यावरणाचा जागर करू शकतो.



आपल्याला थर्माकोलचा वापर टाळता येतो. देवाला वाहिलेली फुलं तसंच इतर निर्माल्य कलशात टाकता येतं. लाउड स्पीकरचा आवाज कमी ठेऊन ध्वनी प्रदूषण टाळता येतं.

# उपराजधानीतील रस्त्यांची अवस्था पाहून उच्च न्यायालयाचा संताप

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

शहरातून जाणाऱ्या विविध महामार्गांच्या दुरवस्थेबाबत वारंवार तक्रारी येत असल्याने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली.



कंत्राटदारांच्या मनमानी कारभाराला एनएचएआय आळा घालू शकत नाही, असे भाष्य करून प्रकल्प संचालकाच्या वर्तवणुकीवर शंका व्यक्त करत न्यायालयाने चौकशीची तंबी दिली. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या प्रकल्प संचालकाच्या पगारातून एक लाख रुपये न्यायालयात जमा करण्याचे निर्देश दिले.

शहरातून जाणाऱ्या विविध महामार्गाबाबत उच्च न्यायालयात विविध जनहित याचिका दाखल आहेत. या सर्व याचिकांवर न्यायालयाने एकत्रितपणे सुनावणी घेतली. एनएचआयच्यावतीने नागपूर ते फेटरी दरम्यान असलेल्या रस्त्याचे रुंदीकरण करण्यात येत आहे.

मागील वर्षी नोव्हेंबरमध्ये हे कार्य एप्रिलपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले होते. मात्र सुनावणीत कार्य पूर्ण करण्यासाठी ३० जूनपर्यंत अतिरिक्त कालावधी देण्याची विनंती एनएचएआयच्याने केली.

न्यायालयाने कारण विचारल्यावर एनएचएआयने मार्गावर असणाऱ्या वृक्षतोडीची परवानगी उशिरा मिळाल्याचे सांगितले. नोव्हेंबर महिन्यात न्यायालयाचे स्पष्ट आदेश असतानाही जानेवारी २०२५ मध्ये परवानगी दिली गेली.

एनएचएआयने यासाठी वृक्ष प्राधिकरणाकडे बोट दाखवले, मात्र न्यायालयाला याबाबत अंधारात ठेवले. यामुळे न्यायालयाने एनएचएआयवर तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली. एनएचएआय प्रकल्प संचालकाची भूमिका संशयास्पद आहे.

एनएचएआयच्या प्रत्येक प्रकल्पात समस्या दिसत आहेत. महामार्गाची दुरुस्ती तसेच वृक्षारोपण कंत्राटदारांसाठी शेवटची प्राथमिकता आहे. एनएचएआय प्रकल्प संचालक याकडे लक्ष देत नाहीत, असे मत व्यक्त करत न्यायालयाने महामार्गाचे कार्य पूर्ण करण्यासाठी अतिरिक्त कालावधी मंजूर केला. मात्र यासाठी प्रकल्प संचालकाच्या पगारातून एक लाख रुपये न्यायालयात जमा करण्याचे निर्देश दिले.

**पाच वर्षात दहा किमी रस्ताही नाही**

नागपूर ते काटोलदरम्यान असलेल्या ४८ किमी लांब रस्त्याचे काम ६०० कोटी रुपयात एका कंत्राटदाराला दिले आहे. कंत्राटदाराने २०२३ मध्ये हे कार्य पूर्ण करणे अपेक्षित होते. मात्र पाच वर्षांपासून दहा किमी रस्त्याचे कार्यही पूर्ण झाले नाही.

या महामार्गावर टायगर कॉरिडोर असल्याने १२ किमी रस्त्याचे काम थांबवण्यासाठी स्वतः एनएचएआयने निर्देश दिले होते. मात्र हे तार्किक कारण वगळले तरी कंत्राटदाराने दहा किमी रस्त्याचेही पूर्णपणे काम केलेले नाही, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

या रस्त्याचे कार्य कधी पूर्ण होईल, याबाबत प्रकल्प संचालकाना शपथपत्र दाखल करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले. याशिवाय कंत्राटदारावर गुन्हा दाखल करण्याबाबत पुढील सुनावणीत निर्णय घेणार असल्याचे स्पष्ट केले.

याशिवाय मुख्य सरकारी वकिलांना संबंधित रस्त्यावरील अपघातांची तसेच मृतांची आकडेवारी सादर करण्याची सूचनाही उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने केली.

## जि. प. च्या माजी अध्यक्षांच्या पतीकडून बनावट कागदपत्राच्या आधारे फसवणूक

### सरपंच विष्णू कोकड्डेंसह तीन जणांवर गुन्हा दाखल

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :

जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा मुक्ता कोकड्डे यांचे पती विष्णू कोकड्डे हे पिपळा डाकबंगलाचे सरपंच आहे. त्यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करून बनावट व बेकायदेशीर कागदपत्रे तयार करीत अनधिकृत ले-आउटला परवानगी दिल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. अधिकारात नसतानाही गावठाण प्रमाणपत्र ग्राम अधिकाऱ्यांमार्फत उपलब्ध करून दिले, ही बाब जिल्हा परिषदेच्या चौकशी समितीत उघड झाली आहे.

फिर्यादी गटविकास अधिकारी मनोजकुमार हिरुडकर यांच्या तक्रारीवरून विष्णू कोकड्डे यांच्यासह ग्रामपंचायत अधिकारी व ले-आउटधारकांवर खापरखेडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सरपंच विष्णू मुकुंद कोकड्डे, ग्रामपंचायत अधिकारी धर्मेंद्र चरणदास बन्सोड, ले-आउटधारक राजेंद्र नारायण नारनवरे, संतोष जागेश्वर महतो अशी आरोपींची नावे आहेत.

सरपंच विष्णू कोकड्डे व ग्रामपंचायत अधिकारी धर्मेंद्र बन्सोड यांनी संगनमत करून राजेंद्र नारनवरे व संतोष महतो यांच्या मालकीच्या पिपळा डाकबंगला येथील ले आउटला अनधिकृत परवानगी दिली. यासाठी बनावट व बेकायदेशीर कागदपत्रे तयार केली, अशी तक्रार ग्रामपंचायत सदस्य अतुल पाटील यांनी केली होती.

यासंदर्भात चौकशी समिती स्थापन करण्यात आली होती. विद्यमान ग्रामपंचायत अधिकारी मधुकर राघोर्ते एका महिन्याच्या वैद्यकीय सुटीवर होते. वलनी ग्रामपंचायत येथे ग्रामपंचायत अधिकारी म्हणून कार्यरत धर्मेंद्र बन्सोड यांच्याकडे 14 जून ते 31 जुलै 2024 पर्यंत ग्रामपंचायत पिपळाचा (डाकबंगलाचा) प्रभार होता. दरम्यान, 29 जुलै 2024 ला तहकूब मासिक सभा 30 जुलै 2024 ला सरपंच विष्णू कोकड्डे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी सरपंच कोकड्डे यांनी हजेरी रजिस्टरवर मुद्दाम स्वाक्षरी केली नाही. या सभेत राजेंद्र नारनवरे व संतोष महतो यांच्या अनधिकृत ले-आउटला परवानगी देण्यात आली.

**अशी फुटली प्रकरणाला वाचा**

31 जुलै 2024 ला बन्सोड यांनी ग्रामपंचायत अधिकारी मधुकर राघोर्ते यांच्याकडे पदभार हस्तांतरित केला. राघोर्ते यांना पिपळा (डाकबंगला) हद्दीतील प.ह.न.52 सर्व्हे नंबर 81 एकूण आराजी 2.32. हे.आर.मधील 1 ते 127 प्लॉट तात्पुरत्या स्वरूपात नावे लावण्यात आला. याशिवाय, कर आकारणी व गावठाण प्रमाणपत्र ले-आउटधारक राजेंद्र नारनवरे व संतोष महतो यांच्या नावाचे दिसून आले. त्यांना सर्व प्रकरणावर संशय आला अन् या प्रकरणाला वाचा फुटली.

**जि. प. अध्यक्षांच्या बंगल्यावरून कट**

जिल्हा परिषदेवर प्रशासक बसण्यापूर्वी जि. प. माजी अध्यक्षा मुक्ता कोकड्डे यांचे शासकीय निवास स्थान नागपूरला होते. याच बंगल्यावर राजकीय दबाब आणून तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी धर्मेंद्र बन्सोड यांना सरपंच विष्णू कोकड्डे घेऊन गेले. त्यांच्याकडून इतिवृत्त लिहून घेण्यात आले. 20 गावठाण प्रमाणपत्रावर व कर आकारणी नमूना आठवर स्वाक्षरी घेण्यात आली. विभागीय चौकशीत ही बाब नमूद आहे.

## महिन्याभरात उष्माघाताचे २३० रुग्ण

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :

नागपूरच्या शहरी व ग्रामीण भागात तापमान वाढत आहे. त्यामुळे नागपुरात उन्हाशी संबंधित रुग्ण वाढत असल्याचे चित्र आहे. नागपूर महानगर पालिकेच्या आरोग्य विभागाने महिन्याभरात नागपूर शहरात उन्हाशी संबंधित एकूण २३० रुग्ण नोंदवले असून त्यात एका उष्माघाताच्या रुग्णाचा समावेश आहे.

दरम्यान नागपुरातील उन्हाशी संबंधित आजाराच्या रुग्णाबाबत आपण जाणून घेऊ या. उन्हाळ्याच्या दिवसात राज्यातील सर्वाधिक तापमान राहणाऱ्या जिल्ह्यात नागपूरचाही समावेश आहे. त्यामुळे यंदा एप्रिलपासूनच नागपुरात चांगलेच उन्ह तापू लागले आहे. नागपुरातील विविध भागात २२ एप्रिलपर्यंत नंदनवन, तहसील, लकडगंज पोलीस ठाणे हद्दीत आठ अनोळखी व्यक्ती बेशुद्धावस्थेत आढळले. रुग्णालयात पोहचण्यापूर्वी वा नंतर त्यांचा मृत्यू झाल्याने हे मृत्यू उष्माघाताचे असल्याचे संशय आहे.

दरम्यान शासकीय रुग्णालयांत या मृतदेहांच्या शवविच्छेदन अहवालातूनच या मृत्यूंचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. महापालिकेकडून मात्र नागपूर शहरात तीन संशयितांची नोंद करण्यात आली आहे. यंदाच्या उन्हाळ्यात तापमान ४३ ते ४४ अंशांपर्यंत पोहचले. त्यामुळे रुग्ण वाढले आहेत. महापालिकेच्या आकडेवारीनुसार, शहरात ८ मेपर्यंत २३० रुग्ण नोंदवले गेले. त्यापैकी एक रुग्ण उष्माघाताचा आहे. ५२ रुग्ण उन्हामुळे पुरळ आलेले, ७२ रुग्ण उन्हामुळे स्नायूला त्रास झालेले, १०५ रुग्ण उन्हामुळे थकवा व इतर त्रास झालेले आहेत.

## वाघाच्या बछड्याला उपचारादरम्यान हार्टअटॅक

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :

देवलापार वनपरिक्षेत्रातून उपचारासाठी आणलेल्या वाघिणीच्या बछड्याचा उपचारादरम्यान ह्यहार्टअटॅकह्नने मृत्यू झाला. मरणासन्न अवस्थेतील या बछड्याला जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात उपचारासाठी प्रादेशिक वनखात्याच्या अखत्यारितील ट्रान्झिट ट्रिटमेंट केंद्रात आणले होते.

माणसाला हार्टअटॅक येतोच, पण आता प्राण्यांना देखील हार्टअटॅक येत असल्याचे समोर येत आहे. विशेषकरुन वाघांमध्ये हा आजार वाढत चालला आहे. नागपूर जिल्ह्यातच अशी अनेक उदाहरणे अलीकडच्या काही वर्षात आढळून आली आहेत. २०२२ मध्ये नागपूर जिल्ह्यातील हिंगणा वनपरिक्षेत्रात नेरी मानकर नियत वनक्षेत्रात एका नाल्यामध्ये वाघीण मृताअवस्थेत आढळून आली. मृत वाघीण ही तीन ते चार वर्षांची होती.



हिंगणा वनपरिक्षेत्राचे कर्मचारी जंगलात गस्त घालत असताना उपक्षेत्र उमरी (वाघ) येथील चंकापुर नाल्यात वाघीणीचे शव दिसून दिसून आले. शवविच्छेदना दरम्यान वाघिणीला हार्टअटॅक आल्यामुळेच तिचा मृत्यू झाल्याचे समोर आले. यानंतर गोरेवाडा बचाव केंद्रात देखील हा प्रकार आढळून आला.

चंद्रपूर येथून जेरबंद करुन आणलेला वाघ वेगळ्या पिंजऱ्यात ठेवण्यात आला होता. मात्र, त्याच्या आजूबाजूच्या पिंजऱ्यात असलेल्या वाघांनी डरकाळी फोडली आणि हार्टअटॅक येऊन या वाघाचा मृत्यू झाला. याशिवाय हैद्राबादच्या प्राणीसंग्रहालयात देखील वाघिणीचा हार्टअटॅकने मृत्यू झाला. तर आता वनखात्याच्याच ट्रान्झिट ट्रिटमेंट केंद्रात जखमी झालेला, पण बरा होत असतानाच हार्टअटॅक आल्यामुळे वाघाच्या बछड्याचा मृत्यू झाला.

जानेवारीपासूनच या बछड्यावर उपचार सुरू होते. मात्र, बुधवारी या बछड्याची तब्येत अचानक खालावली. शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. गौतम भोजने, डॉ. विनोद धूत यांच्या मार्गदर्शनात डॉ. राजेश फुलसुंगे, डॉ. प्रियल चौरागडे यांनी उपचार सुरू केले. मात्र, गुरुवारी उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

## पान १ वरून...

**राष्ट्रवादी काँग्रेसच्या....**

राहूनच नव्याने पक्ष संघटना उभारण्याच्या विचाराचा आहे. त्यामुळे भविष्यात राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र आले तर आश्चर्य वाटू नये, असे ते म्हणाले होते. त्यांच्या या विधानामुळे राजकीय वतुर्ळात वेगवेगळे अंदाज व्यक्त केले जात आहेत. या पार्श्वभूमीवर सुप्रिया सुळे यांनी भूमिका विषद केली आहे.

सुप्रिया सुळे यांनी यावेळी शरद पवारांनी राष्ट्रवादीच्या दोन्ही गटाच्या एकीकरणाविषयी केलेल्या विधानाची आपल्याला कोणतीही कल्पना नसल्याचेही स्पष्ट केले. शरद पवारांनी नेमके काय विधान केले याची मला काहीही माहिती नाही. आपल्या देशात इन्कम टॅक्स संदर्भात एक नवीन कायदा येत आहे. त्यासंबंधीच्या एका महत्त्वाच्या बैठकीला मी काल दिवसभर दिल्लीत होते. त्यामुळे शरद पवार जे काही म्हणाले असतील, त्यावर मी आत्ता काहीही बोलू शकत नाही. त्यांनी कोणत्या संदभार्ने आपले मत मांडले याची मला माहिती घ्यावी लागेल. ही माहिती घेतल्यानंतरच मी त्यावर बोलेन, असे त्या म्हणाल्या.

**ठाकरे सरकार नसते तर...**

यांनी म्हटले आहे. कफ परेट पासून एकूण ३३ किलोमीटरची याची लांबी आहे. या लांबी पैकी मागच्या काळात १३ किलोमीटर लांबीची सुरूवात करण्यात आली होती. आज नऊ किलोमीटरची लांबी सुरू करत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

भविष्यात सज्ज होणाऱ्या मुंबईच्या सार्वजनिक वाहतूक सुविधेचा नवा अध्याय मेट्रोच्या माध्यमातून रचला जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते याच भविष्यवेधी मार्गक्रमणा तील एक मैलाचा दगड म्हणावा अशा मुंबई मेट्रो लाईन-३ सेवेच्या विस्ताराचा शुभारंभ करण्यात आला.

महाराष्ट्र पोलिस, कोस्ट गार्ड किंवा भारतीय नौदल, सर्वच अलर्ट मोडवर असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. या तिघांचीही नियमित एक्सरसाइज कायमच सुरू असते. युद्धजन्य परिस्थितीमध्ये जे जे करणे आवश्यक आहे, त्या-त्या सर्व गोष्टी आम्ही केलेल्या आहेत. अंतर्गत सुरक्षेच्या दृष्टिकोनातून देखील आम्ही बैठका घेत आहोत. अशा स्थितीला कोणत्याही परिस्थितीला तोंड देण्यासाठी आम्ही पूर्णपणे अलर्ट मोडवर असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. अशा काळात वॉर बूक किंवा एसओपीचे योग्य पद्धतीने पालन केले जात असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**महाराष्ट्रात हाय अलर्ट...**

करीत असेल तर त्यावर कारवाई करा.

■ प्रत्येक जिल्हाधिकारी यांना आपत्कालीन फंड आजच देणार, ज्यातून काही तातडीच्या साहित्याची खरेदी करायची असतील तर ती तत्काळ करता येईल. याव्यतिरिक्त कोणताही महत्वाचा प्रस्ताव यासंदर्भात आला तर तो 1 तासात मंजूर करा.

■ एमएमआर क्षेत्रातील सर्व महापालिकांची बैठक घ्या, त्यांनाही ब्लॅकआऊट बाबत जागरूकता निर्माण करण्यास सांगा. यामध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांना सहभागी करून घ्या.

■ पोलिस विभागाने नेहमीपेक्षा जास्त जागरूकता ठेवावी. देशद्रोही व्यक्तींच्या कारवाया वाढण्याची शक्यता पाहता अधिक कोंबिंग ऑपरेशन करा आणि गस्त अधिक चोख करा.

■ सैन्याच्या तयारी संबधित गतिविधीचे चित्रीकरण करणे आणि ते समाज माध्यमांवर प्रसारित करणे हा गुन्हा आहे, त्यावर तत्काळ गुन्हे दाखल करा.

■ सागरी सुरक्षा वाढविण्यासाठी आवश्यकतेनुसार फिशिंग ट्रॉलर्स भाड्याने घ्या.

■ नागरिकांना परिस्थितीबाबत अद्ययावत व खरी माहिती पोहोचवणे यासाठी शासनाकडून व्यवस्था उभी करा.

मॉकड्रिल, ब्लॅकआऊट इत्यादी सर्वच बाबतीत समग्र आढावा घेताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी विविध दिशानिर्देश दिले. प्रभारी मुख्य सचिव राजेशकुमार, राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई पोलिस आयुक्त देवेन भारती, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, नागरी सुरक्षाचे अतिरिक्त पोलिस महासंचालक प्रभातकुमार, गृहविभागाच्या प्रधान सचिव राधिका रस्तोगी, गुप्तवार्ता विभागाचे अतिरिक्त पोलिस महानिरीक्षक शिरीष जैन, मुंबई आणि मुंबई उपनगर जिल्हाधिकारी उपस्थित होते.

**बेकायदा वाहतुकीवर...**

भावना आणि अडचणींचाही विचार केला जाईल, असेही ते म्हणाले.

देशामध्ये स्कूल बस धोरण करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. या धोरणातील त्रुटी दूर केल्या जातील. तसेच यात सुधारणाही केल्या जातील. गुरुवारी झालेल्या बैठकीत स्कूल बस असोसिएशन व पालक असोसिएशन यांनी मांडलेल्या सूचनांचा धोरणातील नियम सुधारणावेळी विचार केला जाईल, असे परिवहन आयुक्त भीमनवार म्हणाले. दरम्यान, याबाबत उपाययोजनेचेही निर्देश दिले आहेत.

स्कूल बस वाहतूक नियमावलीत सुधारणा करताना कोणावर अन्याय होणार नाही, पण नियमही शिथिल होणार नाहीत, स्कूल बस वाहतूक क्षेत्राशी आपण अनेक वर्षे जोडलो आहे. त्यामुळे या क्षेत्रातील अडचणी माहिती आहेत. नियमाचे पालन न करणाऱ्यांना कोणतेही संरक्षण दिले जाणार नाही. परिवहन विभागानेही अनधिकृतपणे विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई केली जाईल, असेही सरनाईक म्हणाले.

: साप्ताहिक संवाद :

## शेअर बाजाराची सावध वाटचाल

लोकरंग

कोणत्याही देशाची प्रगती किंवा अधोगती हि त्या देशाच्या शेअर बाजाराच्या आलेखाच्या स्थितीनुसार तपासता येते. सध्या जगभरात मंदीचे वातावरण आहेच, शिवाय भारत आणि पाकिस्तान या दोन देशामध्ये दहशतवादामुळे अक्षरश युद्धजन्य परिस्थिती निर्माण झालेली आहे.

कोणत्याही क्षणी दोन्ही देशांमध्ये युद्धाचा भडका उडेल अशी परिस्थिती आहे. त्यामुळेच देशाचा आर्थिक कणा असलेल्या शेअर बाजारांनी म्हणजे बीएसई आणि एन एस इ ने सावध वाटचाल सुरु केली आहे. याच पार्श्वभूमीवर शेअर बाजाराची सद्यस्थिती या विषयावर अर्थतज्ज्ञ प्रफुल्ल छाजेड यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद

भारत पाक युद्धाच्या पार्श्वभूमीवर सध्या शेअर बाजाराची वाटचाल कशी सुरु आहे?

■ देशातील दोन्ही शेअर बाजारांनी सध्या सावध वाटचाल सुरु केली आहे. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक १०५.७१ अंक वधारून ८०,७४६.७८ वर स्थिरावला आहे. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ३४.८० अंक वधारून २४,४१४.४० वर बंद झाला. भारतीय सैन्याने पाकव्याप्त काश्मीरमध्ये क्षेपणास्त्र हल्ले केल्यानंतर मुंबई शेअर बाजाराची हि प्रथम प्रतिक्रिया होती.

त्यावेळी निर्देशांक अगदी ७९,९३७.४८ अंशावर इतक्या नीचांकी पातळीवर होता जो नंतर वधारला.टाटा मोटर्स सारख्या वाहन उद्योगातील निवडक कंपन्या आणि बँका यांच्या समभागांची गुंतवणूकदारांनी खरेदी केल्यामुळे सेन्सेक्सची वाटचाल सकारात्मक होऊ शकली.

खबरदारीचा उपाय म्हणून शेअर बाजाराने कोणत्या उपाय योजना केल्या?

■ शेअर बाजार अर्थात बीएसई आणि एन एस इ अर्थात राष्ट्रीय शेअर बाजार यांनी खबरदारीचा उपाय म्हणून आंतरराष्ट्रीय वापरकर्त्यांसाठी त्यांच्या वेबसाईट्स ब्लॉक केल्या.

बीएसई हे देशातील महत्वाचा भांडवल बाजार असल्याने संभाव्य सायबर धोक्यांसाठी देशांतर्गत आणि आंतर राष्ट्रीय स्तरावर जोखीमनावर सतत लक्ष ठेऊन असतो. पाकिस्तानवर केलेल्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर सावधगिरीचा उपाय म्हणून संरक्षणात्मक उपाय म्हणून सायबर प्रणालीचे संरक्षण करण्यासाठी या वेबसाईट्स ब्लॉक केल्या.

भारत पाक युद्धाच्या अनुषंगाने जागतिक स्तरावर शेअर बाजाराची स्थिती कशी आहे?

■ ऑपरेशन सिंदूर मुळे पाकिस्तानचा कराची स्टॉक एक्स्चेंज कोसळला. बाजाराचा निर्देशांक के एस इ १०० बाजार उघडला तेंव्हा ६,५६०.८२ अंकांनी खालच्या पातळीवर उघडला होता.

पाकिस्तानचा भांडवल बाजार हा नीचांकी पातळीवर पोहचला होता. आशियाई बाजारामध्ये दक्शीन कोरियाचा कॅस्पी , शांघायचा एन एस इ कंपोझिट आणि हॉकॉंग चा हॅन्गसेंग हे निर्देशांक वधारले.

जपानचा निक्केई २२५ ने घसरला. युरोप यामधील जवळपास सर्वच शेअर बाजार नकारात्मक राहिले. अमेरिकन शेअर बाजार देखील घसरला तर आंतर राष्ट्रीय तेल बाजारात क्रूड ऑईलचे भाव वधारले.

■ ■ ■

## मध्य प्रदेशातील पर्यटन स्थळांची रोमांचक झलक आता किडझानियामध्ये

मध्य प्रदेश इतिहास, संस्कृती, अध्यात्म आणि वन्यजीवनाचा एक अद्भुत मिश्रण आहे. किडझानियाच्या माध्यमातून राज्याचा गौरवशाली वारसा, वन्यजीव आणि समृद्ध संस्कृती भावी पिढ्यांना मनोरंजक आणि आकर्षक पद्धतीने सादर केली जाईल. किडझानिया मुंबई येथे एमपी टुरिझम एक्सपिरीयन्स सेंटरच्या उद्घाटन प्रसंगी पर्यटन आणि संस्कृतीचे प्रधान सचिव आणि एमपी टुरिझम बोडार्चे व्यवस्थापकीय संचालक शिव शेखर शुक्ला बोलत होते. यासोबतच, किडझानिया दिल्ली येथे एक पर्यटन अनुभव केंद्र देखील सुरू झाले.



प्रधान सचिव शुक्ला म्हणाले की, मध्य प्रदेशात प्रत्येकासाठी सर्वकाही आहे. देशातील जवळजवळ सर्व पर्यटन स्थळे मध्य प्रदेशात आहेत. विशेषतः मध्य प्रदेशातील स्थानिक आदिवासी संस्कृतीचा अनुभव पर्यटकांसाठी अनोखा आहे. आदिवासी संस्कृती प्राचीन काळापासून जतन केली गेली आहे आणि तिच्या मूळ स्वरूपात जतन केली गेली आहे. तसेच, मध्य प्रदेश हे इतिहास प्रेमींसाठी स्वगार्सारखे आहे. येथे १८ युनेस्को जागतिक वारसा स्थळे आहेत. यापैकी ३ कायमस्वरूपी यादीत आणि १५ तात्पुरत्या यादीत समाविष्ट आहेत. या कार्यक्रमात किडझानिया आणि एमपी टुरिझम यांच्यात सामंजस्य करार विनिमय समारंभ पार पडला. मध्य प्रदेश पर्यटन अनुभव केंद्राचे उद्दिष्ट मुलांना राज्यातील नैसर्गिक वारसा, जैवविविधता, नद्या आणि सांस्कृतिक वारशाशी मनोरंजक आणि सर्जनशील पद्धतीने जोडणे आहे.

हा उपक्रम मुलांना केवळ एक रोमांचक अनुभव देत नाही तर त्यांच्या माध्यमातून संपूर्ण कुटुंबाला मध्य प्रदेशातील पर्यटन स्थळांकडे आकर्षित करतो. या केंद्रात दोन प्रमुख व्हर्च्युअल अनुभव दिले जात आहेत - जंगल सफारी आणि रिव्हर राफ्टिंग. जंगल सफारी दरम्यान, मुलांना व्हर्च्युअल जीप सफारीमध्ये मध्य प्रदेशातील घनदाट जंगले, राष्ट्रीय उद्याने आणि वन्य प्राण्यांचा जवळून अनुभव मिळतो.

■ ■ ■

## चिवचिव चिमणी

चिमण्या हे भारतभर आढळणारे छोटे पक्षी आहेत. त्यांचे वैज्ञानिक नाव पॅसेरिडे आहे. जगभरात चिमण्यांच्या सुमारे २४ प्रजाती आढळतात. चिमण्या झाडांवर घरटी बांधतात आणि अनेकदा गटात राहतात. दरवर्षी 20 मार्च रोजी जागतिक स्पॅरो दिवस साजरा केला जातो.

चिमण्या आकाराने लहान असतात, त्यांची लांबी 14 ते 16 सेंटीमीटर असते. त्यांचे वजन अंदाजे 25 ते 40 ग्रॅम असते. ते 10,000 ते 12,000 फूट उंचीपर्यंत उडू शकतात.

चिमण्यांना पिवळी चोच आणि उडण्यासाठी दोन पंख असतात. ते किलबिलाट आवाज करतात. चिमणीचे सरासरी आयुर्मान ४ ते ६ वर्षे असते. ते ताशी 35 किलोमीटर वेगाने उड्डाण करू शकतात.

चिमण्या वर्षभरात सुमारे ३ ते ५ अंडी घालतात. पिल्ले १३ ते १५ दिवसांनी घरटे सोडतात. जोपर्यंत ते उड्डाण करू शकत नाहीत तोपर्यंत ते त्यांच्या पालकांसोबत राहतात.

15 ते 20 दिवसांनंतर ते उडण्यास सुरवात करतात. चिमण्या सहसा मानवी वस्तीजवळ घरटे बांधतात.शहरी आणि ग्रामीण चिमण्या धान्य आणि लहान कीटक खातात. त्यांची शिकार मांजर, साप, कुत्रे, कोल्हे आणि गरुड करतात.. निसर्गाचा समतोल राखण्यात चिमण्या महत्त्वाची भूमिका बजावतात.



■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## दोन अपघातात दोघांचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. ९ :

पुण्यातील जांभुळवाडी आणि कर्वे रस्ता येथे दोन जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली. कवेरोड परिसरातील आशा हॉटेल समोरुन पांडुरंग लांडे (वय ७०) हे मॉर्निंग वॉकसाठी जात होते. त्यावेळी दुचाकीचालक अथर्व प्रमोद कर्डीले याने धडक दिली. यात लांडे यांचा मृत्यू झाला.

दुसऱ्या घटनेत आंबेगाव परिसरात जांभुळवाडी येथे अलताब नवशाद सलमानी (वय ३) या मुलास भरधाव वेगात जात असलेल्या टेम्पो याने उडवले. त्यामुळे अलताब हा गंभीर जखमी होऊन मृत झाल्याची घटना घडली . या घटनेनंतर पसार झालेल्या टेम्पो चालकाविरोधात इरशाद मेंहदीहसन सलमानी यांनी ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

## अकोल्याचा तरुण कान्स मध्ये

### अ डॉल मेड अप ऑफ क्ले लघुपटाची निवड

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. ९ :

पुण्याच्या मास कम्युनिकेशन विभागात २०१८-२० दरम्यान शिक्षण घेतले. यावेळी आंतरराष्ट्रीय कान्स' चित्रपट महोत्सवात सहभागी होण्याचे स्वप्न बघितले. आपण कधीतरी जेथे जाणार, असा निश्चय तेव्हाच बाळगला. अनेकांना तो बोलून दाखवला. पण सर्वांनी तेव्हा थट्टा केली.



पण आज २०२५ मध्ये दृढ इच्छाशक्ती आणि प्रयत्नामुळे स्वप्न सत्यात आले. अजूनही ही गोष्ट स्वप्नवतच वाटते आहे, अशी भावना व्यक्त केली साहिल मनोज-अनिता इंगळे यांनी.

अकोल्याच्या साहिल इंगळे या तरूणाने निर्माण केलेल्या ह्यअ डॉल मेड अप ऑफ क्लेह्न या लघुपटाची जगप्रसिद्ध कान्स' चित्रपट महोत्सवासाठी निवड झाली आहे. ह्यकान्सह्नसाठी यंदा निवड झालेला हा देशातील एकमेव लघुपट आहे. रात्री दीड वाजता कान्सकडून लघुपटाच्या निवडीचा मेल आला आणि झोपच उडाली. अनेकदा स्वतःला चिमटे काढत होते. स्वप्नपूतीर्चा आनंद व्यक्त करायला शब्द बाहेर पडत नव्हते.

कोलकात्याच्या सत्यजीत रे फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूटमध्ये साहिल इंगळे प्रोड्युसिंग फॉर फिल्म अँड टेलिव्हिजन या कोर्सचे पदव्युत्तर शिक्षण घेत आहे. विभागाच्याह्नझिरो बजेट ॲक्टिव्हिटी अंतर्गत' हा संपूर्ण २३ मिनिटांचा लघुचित्रपट ४ दिवसात तयार झाला. चित्रपटाचा नायक कोलकता येथे खेळण्यासाठी आला होता. त्यांच्या जीवनपटापासून प्रेरणा घेत, यात काही बदल करून अ डॉल मेड अप ऑफ क्ले पडद्यावर उतरला. संपूर्ण चित्रपट विद्यार्थ्यांनी तयार केला.

यामध्ये दिग्दर्शक कोको (इथोपिया), कार्यकारी निमार्ता रोहित कोडरे, उमा कुमारी, तसेच लाईन प्रोड्युसर अनिवाश धुर्वे यांचे महत्त्वाचे योगदान राहिले.

एक नायजेरियन तरूण खेळाडूची कथा; खर्च शून्य एक नायजेरियन खेळाडू भारतात फुटबॉलपटू म्हणून ओळख निर्माण करण्यासाठी वडिलांची शेती विकतो. स्वप्न पूर्ण होण्यात येणारे अडथळे व प्रयत्न यांची ही कहाणी आहे. चित्रीकरणासाठी इन्स्टिट्यूटची साधने वापरली. बाकी खर्च शून्य झाला. आर्थिक मदतीशिवाय लघुपट पूर्ण झाला. इच्छा असेल तर अल्प साधनांतही चांगला चित्रपट निर्माण करता येतो, असे साहिल म्हणाला.